# प्रकरण दुसरे

# प्रकरण दुसरे

# कोकणातील राजकीय परिस्थिती (सन १७५६ ते १८१८)

इ.स. १७५६ च्या सुमारास कोकणात पुढील प्रमुख सत्ता होत्या. १) पेशवे, २) सिद्दी, ३) कोल्हापूरकर, ४) सावंतवाडीकर, ५) पोर्तुगीज, ६) इंग्रज वरील सत्तांच्या ताब्यातील प्रदेश साधारणपणे पुढील प्रमाणे होता.

## १) पेशवे

दक्षिण कोकण - सुवर्णदुर्ग, देवगड, अंजनवेल, गोवळकोट, चौल, गुहागर, रत्नागिरी[१]

उत्तर कोकण - तारापूर, ठाणे, वसई, कल्याण, बेलापूर, पनवेल, रेवदंडा, कुलाबा, हिरा कोट, सागर गड, माणिकगड, खांदेरी, बाबूराव पेशव्यांचा सरखेल, महाड, साष्टी, मनोरी, माहिम, महाड, कर्नाळा, अवचितगड, पाली, मंडनगड, राजमाची, कुवारीगड, नवापुरा, तळे, घोसाळे, लिंगाणा, कांगोरी, चंदनगड, महिपतगड, इ.[२]

## २) सिद्दी

आफ्रिकाखंडाच्या पूर्वभागात ॲबेसिनिया (इथोपिया) नावाचा देश आहे. सिद्दी हे मूळचे या देशातील रहिवाशी होत. हे धर्माने कट्टर मुसलमान व दर्यावर्दी लोक होते. १७ व्या शतकात अरबी समुद्रावर इतर युरोपिय सत्तांबरोबर आपले वर्चस्व प्रस्थापित करुन राहिले होते.[३]

खांदेरी, उंदेरी (जयदुर्ग), पद्मदुर्ग, जंजीरा - खांदेरी उंदेरीवर २८/१/१७५९ रोजी रघुजी आंग्रेचा ताबा, सिद्दीने उंदेरी किल्ला पेशव्यास नजर केला.

३) **कोल्हापूरकर**

सिंधुदुर्ग, मालवण, प्रसिध्दगड, मनोहरगड, भैरवगड, राजकोट, पद्मगड व सर्जेकोट[४]

४) **सावंतवाडीकर**

रेडी, पेडणे, डिचोली, सांखली, वेगुर्ले, यशवंतगड, कुडाळ[५]

५) **पोर्तुगीज**

नगर हवेली, आग्वाद किल्ला, भरत ग्राम, पेडणे, सांखळी हे सावंतवाडीकरांचे प्रदेश युध्द न करता मिळविले.[६]

६) **इंग्रज**

२८/१२/१७७४ साष्टी बेट मिळाले. त्यानंतर वर्सोवा, करंजा ही ठाणी इंग्रजांनी घेतली. ११/५/१७८० रोजी १ वाजता कल्याणचा ताबा घेतला. येथे इंग्रजांचा मुलकी कारभार फेब्रुवारी १७८१ मध्ये सुरु झाला. नाणी मात्र मराठयांचीच होती.[७]

११/१२/१७८० रोजी वसईचा किल्ला काबीज केला.[८] १/११/१८१२ कोल्हापूरकरांच्या संरक्षणाच्या हमीच्या बदल्यात कोल्हापूरकरांचे मालवण, सिंधुदुर्ग, राजकोट, पद्मगड व सर्जेकोट हे किल्ले इंग्रजांकडे आले. ८/११/१८१२ रोजी या तहावर सहया झाल्या.[९]

३/११/१८१२ च्या तहानुसार सावंतवाडीकरांचे वेगुर्ला, बतेरी (तोफखाना) चौकी व बंदर यासह संपूर्ण अधिकार सोडून इंग्रजांना दिले. इंग्रज वेंगुर्ले, मालवण व त्यामधील किल्ले यांचे मालक बनले.

सावंतवाडीकरांनी सन १८१८ मध्ये इंग्रजांचे मांडलिकत्व स्विकारले.

कोकणातील उपनिर्दिष्ट सत्तांचे परस्परसंबंध हे अति संघर्षाचे होते. कधीकधी त्यांच्यातील परस्पर संबंध मित्रत्वाचेही निर्माण झाल्याचे आढळतात.

परस्परांच्या विरोधात या सत्तांमध्ये वेळोवेळी विविध सत्तांच्या युतीही झाल्याचे आढळते.

साधारणपणे वरील सत्तांमधील परस्परसंबंध हे मित्रत्वापेक्षा विरोधाचेच अधिक वेळा असलेले आढळतात.

या सत्तांत एतद्देशीय व परकीय असे दोन गट असलेले आढळतात.

**सावंतवाडी संस्थान**

इ. स. १५१० पासून भारताच्या पश्चिम किनाऱ्याला भारतीय इतिहासात महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले. त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय इतिहासातही महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले. या आंतरराष्ट्रीय संबंधात सावंतवाडीची भूमिका महत्त्वपूर्ण होती.

भौगोलिकदृष्टया सावंतवाडी संस्थान हे दक्षिण कोकणामध्ये समाविष्ट होते. सावंतवाडीचा समुद्र किनारा युरोपियनांच्यासाठी महत्त्वाचा होता. कारण रेडी हे सावंतवाडीकरांचे प्रमुख बंदर पोर्तुगीजांच्या पणजीपासून २१ मैल अंतरावर होते आणि

इंग्रजी सत्तेचे प्रमुख केंद्र मुंबई हे २८० मैलांच्या अंतरावर होते. त्यामुळे युरोपियनांच्या दृष्टिने सावंतवाडीला महत्त्वपूर्ण स्थान होते.

**भौगोलिक स्थान**

सावंतवाडीच्या भौगोलिक सीमा या १७° उत्तर अक्षांश ते १५° दक्षिण अक्षांशावर होते. हा प्रदेश घनदाट अरण्ये व उंच डोंगरांनी (सहयाद्रीच्या) व्यापलेला होता.

सावंतवाडीची उत्तर सीमा गडनाडी या घोटगे घाटात उगम पावणाऱ्या नदीपर्यंत होती. कारली नदी गडनाडीच्या दक्षिणेला आहे. ही नदी मनोहरगडाच्या जवळ शिवपूर येथे उगम पावते व मालवण येथील देवबाग येथे समुद्रास मिळते.

हा अखूड नद्यांचा, डोंगरकपारींचा व अति पर्जन्यवृष्टींचा प्रदेश नागली, नाचणी, भात इ. पिकांसाठीच उपयुक्त होता. तसेच येथील हवामान नारळासाठी व आंब्यासाठी उपयुक्त होते. कोकण किनाऱ्यावरील जंगले व डोंगर रांगा यांनी या प्रदेशाच्या राजकीय व लष्करी घटकांवर खूप परिणाम घडवून आणला.[१०]

सावंतवाडीच्या भोसले कुटुंबाला आदिलशाहीकडून सावंतवाडीची देशमुखी (इ.स. १६२७ ला) खेम सावंत १ ला दिली. सावंतवाडीकरांचे प्रमुख ठिकाण कुडाळ होते.

राजकीयदृष्टया १७ व्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत सावंतवाडीकर आदिलशाहीस आपले मालक समजत होते.

गोवेकरांचा व शिवाजीचा संबंध जेंव्हा सावंतवाडीकरांशी आला तेंव्हा सावंतवाडीकरांनी आपल्या धन्याची म्हणजे आदिलशाहीची बाजू सुरक्षित राखण्याचा प्रयत्न केला.

शिवाजीपासून कोकण प्रदेशाचे संरक्षण करण्याचे खेम सावंतने आदिलशहास वचन दिले होते आणि त्यानुसार त्याने खवासखानाच्या मदतीने शिवाजीचा कोकणात प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला होता.[११]

सन १७०१ मधील फेब्रुवारीच्या अखेरीस खेम सावंत हा कुडाळ, पेडणे, डिचोली (भरतग्राम) सांखळी (सत्तर) व मणेरी हया पांच महालांचा सरदेसाई झाला.[१२]

शाहू महाराजांच्या सुटकेनंतर खेम सावंतने आपली राजनिष्ठा महाराणी ताराबाईशी प्रकट करुन कुडाळ, बांदे, डिचोली, पेडणे, मणेरी व सांखळी हे महाल वतनादाखल त्यांच्याकडून सन १७०८ मध्ये मिळविले.[१३]

## सावंतवाडीकर पोर्तुगीज संबंध

जयरान आणि रामचंद्र सावंत यांच्या अंतर्गत संघर्षाचा पोर्तुगीजांनी राजकीय गैरफायदा मिळविला. रामचंद्र सावंतने; पोर्तुगीजांच्या सैन्याच्या मदतीने जयराम सावंतने वेंगुर्लेस घातलेला वेढा उठविला.[१४] या बदल्यात रामचंद्र सावंतास पेडणे आणि सत्तरी महाल आणि डिचोलीचा किल्ला, हर्लोर्ना आणि तेरेखोल यावरील हक्क सोडून द्यावे लागले.

या अपमानकारक तहानंतर रामचंद्र सावंत मृत्यू पावला म्हणून जानकीबाईने पेडणे आणि साखळी हे महाल पोर्तूगीजांपासून परत मिळविण्याचा प्रयत्न केला. ९/४/१७५८ रोजी सावंतवाडीच्या आरमाराने अचानक हल्ला करुन पेडणे व साखळी हे

महाल परत मिळविले. पण हर्लोर्ना, तेरेखोल आणि डिचोली हे किल्ले घेण्यात त्यांना अपयश आले.

पेडणे व साखळी हे दोन किल्ले घेण्यात सावंतवाडीकरांना आलेल्या अपयशाने सावंतवाडीकरांची लष्करी दुर्बलता व आर्थिक अडचणी स्पष्ट झाल्या व त्यामुळे त्यांना पोर्तुगीजांशी शांततेचे संबंध आवश्यक झाले. पेशवे फौजा या प्रदेशात सावंतवाडीकरांच्या मदतीस येतील अशी पोर्तुगीजांना भिती वाटत होती.[१५] अशा परिस्थितीत पेशवा बाळाजी बाजीरावाने मध्यस्थी करुन सावंतवाडीकरांनी व पोर्तुगीजांनी आपापसातील मतभेद संपवून तह करावा म्हणून आपला वकील पोर्तुगीज व्हाईसरॉयकडे पाठविला.[१६]

पेशव्यांच्या मध्यस्थीने २६/७/१७५९ रोजी सावंतवाडीकर व पोर्तुगीज यांच्यात तह झाला. त्यानुसार सावंतवाडीकरांनी पोर्तुगीजांना एका वर्षास ५० हजार आश्रफी दयावेत व पोर्तुगीजांनी पेडणे, डिचोली व साखळी हे महाल सावंतवाडीकरांना द्यावेत. या तहात स्पष्ट करण्यात आले की, वरील महाल सावंतवाडीकरांना भाडेपट्टयाने द्यावेत. तसेच हेही स्पष्ट झाले की, पेडणे व डिचोली महालातील हर्लोर्ना व तेरेखोल हे किल्ले पोर्तुगीजांनी सोडले नाहीत.

५० हजार आश्रफी या खंडणीबरोबरच सावंतवाडीकरांना पोर्तुगीजांच्या पेडणे व डिचोली महालातील किल्ल्यांकडे जाण्याचा मार्ग पोर्तुगीजांना द्यावा लागला व गोवा राज्याच्या सेवेत असलेल्या कृष्णा सावंत यास सावंतवाडीकरांनी वार्षिक २००० रुपये पेन्शन द्यावी असे ठरले.[१७]

पानिपतावर १७६१ मध्ये मराठयांचा पराभव झाल्यानंतर पोर्तुगालच्या राजाने गोवा व्हाईसरॉयला १६/२/१७६१ रोजी पत्र पाठवून सूचना दिली की, गोवेकरांनी सावंतवाडीकरांशी मैत्रीचे संबंध ठेवावेत.[१८] तसेच त्याने सल्ला दिला की, व्हाईसरॉयने पेशव्याचा फोंडयाचा किल्ला ताब्यात घेऊन सोंदेकरांना द्यावा आणि सावंतवाडीकरांचे आरमार सामर्थ्यशाली बनणार नाही याची दक्षता घ्यावी.[१९]

या योजनेनुसार पोर्तुगालच्या राजाने सावंतवाडीकरांचा पोर्तुगीजांनी ताब्यात घेतलेले महाल परत करण्याचा प्रस्ताव स्विकारला. पोर्तुगालच्या राजाच्या सूचनेनुसार गोवा व्हाईसरॉयने खेम सांवत ३ बरोबर २४/१२/१७६१ रोजी तह केला.[२०]

**फोंडयावर हल्ला**

मे १७६३ मध्ये ७०० पोर्तुगीज सैन्यांनी बिषप अलीक नारसुच्या नेतृत्वाखाली सावंतवाडीकरांच्या ५०० सैनिकांसह पेशव्याच्या ताब्यातील फोंडा महालावर आक्रमण केले. पोर्तुर्गीज सैन्याने सावंतवाडीकरांच्या सैन्यांच्या मदतीने जून १७६३ मध्ये मर्दनगड जिंकला.[२१]

याचवेळी सावंतवाडीकरांच्या अंतर्गत प्रशासनात एक महत्त्वपूर्ण बदल घडून आला. जयाप्पा व सखुबाई शिंदे यांची मुलगी लक्ष्मीबाई हिच्याबरोबर खेम सांवत ३ चा विवाह झाला. लक्ष्मीबाई ही महादजी शिंदेची पुतणी होती. त्यामुळे शक्तीशाली महादजी शिंदेचा पाठींबा सावंतवाडीकरांना मिळाला. परिणामी खेम सांवत ३ ने राज्यकारभाराचा ताबा त्याच्या आईकडून स्वतःकडे घेतला व स्वतंत्रपणे राज्यकारभार करु लागला. जिवाजी विश्राम सबनीस याचेही कारभारी म्हणून असलेले महत्त्व संपुष्टात आले.[२२]

पानिपत नंतर सावंतवाडीकर व पोर्तुगीज यांच्यात निर्माण झालेले मैत्रीचे संबंध इ.स. १७७४ पर्यंत टिकून राहिले. जेंव्हा जानोजी धुळपाची फौज मर्दनगड पुन्हा जिंकून घेण्यासाठी साखळी येथे आली.[२३] तेंव्हा जानोजी धुळपाच्या या लष्करी हालचालीची माहिती खेम सावंत ३ ने पोर्तुगीज व्हाईसरॉयला दिली.

## सावंतवाडीकर पोर्तुगीज आणि पेशवा संबंध

ज्यावेळी माधवराव पेशव्याने दुर्लक्ष केल्यामुळे ईस्ट इंडिया कपंनीचे विस्तरवादी धोरण स्पष्ट झाले त्यावेळी पेशव्याला दुर्बल पोर्तुगीजांकडून मर्दनगड परत मिळविण्याची आवश्यकता भासली. पेशव्याने इ.स. १७६८ मध्ये दक्षिणेतील आपली स्थिती दृढ केल्यावर मार्च १७६८ मध्ये पेशव्याने मर्दनगड परत मिळविण्यासाठी सावंतवाडीकरांची मदत मिळविण्याचा प्रयत्न केला.[२४] खेम सावंतने १० हजार स्वारांची मदत पाठवून पेशव्यास ताबडतोब प्रतिसाद दिला.

पेशव्याची सेना विसाजीपंत लेलेच्या नेतृत्वाखाली होती. सावंताचे आरमार व पेशव्याचे आरमार एकत्र आले तेंव्हा विसाजीपंत सावंतवाडीकरांशी बोलणी करण्यासाठी पुढे झाले.

खेम सावंत ३ ने पोर्तुगीजांशी मैत्रीचे संबंध टिकविण्यासाठी त्यांना कळविले की, पेशव्याची स्वारी हैदरअलीचा प्रदेश जिकंण्यासाठी येत असून मी पेशव्यांना विरोध करु शकत नाही. खेम सावंत ३ हा पोर्तुगीज व पेशवा यांच्याशी असलेल्या त्याच्या संबंधात समतोल राखण्याच्या प्रयत्नात होता. सावंतवाडीचे अस्तित्व अशा समतोलावरच अवलंबून होते. पेशव्याचा सरदार विसाजीपंत हा इतका समर्थ होता की,

तो पोर्तुगीजांना अशी धमकी देऊ शकत होता की, पोर्तुगीजांनी योग्य वाट न दिल्यास मराठा फौज फोंडा महालातून मार्गक्रमण करेल.[२५]

अशा प्रकारे पेशव्यांच्या सैनिकी दबावाच्या पार्श्वभूमीवर पोर्तुगीजांना सावंतवाडीकरांशी झालेल्या तहाचा शेवट करणे योग्य वाटले.

२४/१०/१७६८ चा तह हा मुख्यत्वे ४ हजार आश्रफीच्या खंडणीच्या संदर्भात होता की, जी बाकी सावंतवाडीकरांनी दिलेली नव्हती. त्यामुळे ती बाकी ५० हजार एवढी झाली होती.[२६] त्यासाठी तरतुदी केलेल्या होत्या. याशिवाय पोर्तुगीजांना पेडणे, डिचोली व साखळी महाल खेम सावंताने भाडेपट्टयावर देण्यासाठी त्याला प्रवृत्त करण्यात आले. मात्र वरील महालातील खोती ही परंपरागत देसाईकडेच राहिल.

पोर्तुगीजांच्या सावंतवाडीकरांच्या संदर्भातील धोरणात आक्रमकतेऐवजी मैत्रीपूर्ण संबंध निर्माण होण्याचे कारण की, महादजी शिंदेच्या नेतृत्वाखालील मराठी सत्ता ही हिंदुस्थानातील सर्वश्रेष्ठ सत्ता बनली होती.

पोर्तुगीज व पेशवा संबध ऑगस्ट १७७२ मध्ये अनिच्छेने ताणले गेले.[२७] पेशव्याच्या ताब्यातील प्रदेशात पोर्तुगीज सैन्याने त्रास देणे (दंगा करणे) सुरु केले. पेशव्यांनी खेम सावंत ३ ला पोर्तुगीज सैन्यावर लक्ष ठेऊन दंगाधोपा करणाऱ्या पोर्तुगीज सैनिकांना शिक्षा करण्याबद्दल सूचना दिली. या सूचनेला प्रतिसाद म्हणून खेम सावंतांनी पेशव्यांना कळविले की, पोर्तुगीज सामर्थ्यवान बनलेले असून ते पेशव्याच्या प्रदेशावर हल्ला करण्याची योजना आखत आहेत.

13779

खेम सावंताकडून सूचना मिळालेल्या पेशव्यांनी पोर्तुगीजांच्या सीमेवर असलेल्या विजयदुर्ग, साष्टी इ. प्रदेशात आपले लष्करी सामर्थ्य वाढविले.[२८] पेशव्यांचा आरमार प्रमुख जानोजी धुळप याला सूचना देऊन सतर्क बनविण्यात आले.

परकीय सत्तेपासून स्वतःच्या प्रदेशाच्या संरक्षणासाठी पेशवा व सावंतवाडीकर यांच्यात सामंजस्य असणे योग्य होते.

या दिशेने कोल्हापूरकर तिसरा शिवाजी याने वैशिष्टयपूर्ण पहिली हालचाल केली. त्याने इ. स. १७७४ मध्ये पेशवा, शिंदे, होळकर आणि सावंतवाडीकर यांना पोर्तूगीजांच्या विरुध्द एकत्र आणण्याचा प्रयत्न केला.[२९]

या सर्व सत्तांना स्वानुभवाने परकीय सत्तांचा आक्रमकपणा लक्षात आला होता आणि त्यांना प्रतिकार करण्यासाठी एतद्देशीय शेजारील सत्तातील प्रामणिक व ठोस युतीच आवश्यक आहे हे लक्षात आले होते.

एतद्देशीय शेजारी सत्तामधील परस्परांबद्दल शंका, तिरस्कार यामुळे अशा प्रकारच्या युतीच्या कोल्हापूरकरांच्या प्रयत्नाला यश आले नाही व अशी युती झाली नाही.

जरी अशी मोठी युती पोर्तुगीजांविरुध्द अस्तित्वात आली नाही. तरी पुणे दरबारने जानेवारी १७७५ मध्ये खेम सावंत ३ ला कांही मदत पाठविण्याविषयी विनंती केली.

पुणे दरबारने बाळाजी महादेव यास सावंतवाडीला पाठवून त्याच्याजवळ सूचना दिल्या की, पोर्तुगीजांनी कांही समस्या निर्माण केल्यास त्यांना शिक्षा करावी. शिवाय पेशवे दरबारने सावंतवाडीकरांना सूचना दिली की, पोर्तुगीजांनी विजयदुर्गावर स्वारी

केली तर सावंतवाडीकरांनी बारदेश प्रदेशावर आक्रमण करावे.[३०] अशा परिस्थितीत पुणे दरबारने खेम सावंत ३ ला पोर्तुगीजांविरुध्द लष्करी मदत करण्याचे वचन दिले.

२४ जून १७८० पर्यंत पोर्तुगीजांनी सावंतवाडीकरांशी मैत्रीचे संबंध टिकविण्याचा प्रयत्न केला. दोन महिन्यानंतर लगेच सावंतवाडीकरांनी पोर्तुगीजांशी समझोता करण्यासाठी नवीन तरतुदी बनविल्या.[३१] आणि १६/९/१७८० रोजी सावंतवाडीकरांनी पोर्तुगीजांना एक मसुदा पाठविला.[३२]

या सर्व तरतूदी मित्रत्वाच्या होत्या. शिवाय सावंतवाडीकरांनी कोल्हापूरकरांच्या लष्करी हालचालींची पोर्तुगीजांना ३/११/१७८० रोजी माहिती दिली होती.[३३]

नोव्हेंबर १७८० मधील सावंतवाडीकरांचे धोरण दुटप्पी पणाचे वाटते की, ज्यामुळे त्याने पेशवा व पोर्तुगीज यांच्यातील साशंकता व गैरसमज वाढविण्याचा प्रयत्न केला.

खेम सावंत ३ ने १०/१०/१७८० रोजी पेशव्याला कळविले की, पोर्तुगीज पेशव्याच्या प्रदेशावर आक्रमण करण्याच्या योजना आखत आहे.[३४] लगेच ५ व्या दिवशी १५/१०/१७८० रोजी खेम सावंत ३ ने जिवाजी विश्रामजवळ घोडे व कपडे मित्रत्वाचे प्रतिक म्हणून पोर्तुगीजांना पाठवून दिले.[३५]

पुन्हा १८/११/१७८० रोजी खेम सावंत ३ ने पुणे दरबारास कळविले की, पोर्तुगीजांचा नवीन व्हाईसरॉय पुणे सरकारच्या प्रदेशावर आक्रमण करण्याचा गंभीरपणे विचार करीत आहे. २९/११/१७८० रोजी पोर्तुगीजांनी खेम सावंत ३ ला पत्र पाठवून त्याच्याशी मैत्रीचे संबंध टिकविण्याचा प्रयत्न केला.

खेम सावंत ३ ने पेशव्याला पाठविलेल्या दोन पत्रातील मजकुरावरुन पोर्तुगीजांचा पेशव्याच्या प्रदेशावर हल्ला करण्याचा बेत पक्का असल्याचे दिसते. पण पोर्तुगीजांना आपल्या मर्यादा माहित असल्यामुळे त्यांनी पेशव्यांविरुध्द आक्रमण करण्याचे नियोजन केले नाही.

## सावंतवाडीकर व पोर्तुगीज यांच्यातील संघर्ष

पेशवे व पोर्तुगीज यांच्यात अविश्वासाचे वातावरण तयार करण्याचे खेम सावंत ३ चे धोरण पोर्तुगीजांच्या लक्षात आले. सावंतवाडीकरांनी वरील धोरणाचा अवलंब निश्चितपणे स्वतःच्या सुरक्षिततेसाठी केला होता. जून १७८१ मध्ये सावंतवाडीकरांनी कोल्हापूरकरांच्या विरोधात रांगण्याला वेढा घातला आणि या संघर्षाचा पोर्तुगीजांना सावंतवाडीकरांच्याविरुध्द गैरफायदा घेण्याची संधी मिळाली.[३६] सावंतवाडीकरांनी पोर्तुगीजांना हत्यारे, सैन्य व दारुगोळा पाठविण्याविषयी विनंती केली.[३७]

एका बाजूला पोर्तुगीजांनी सावंतवाडीकरांना मदत पाठविली व दुसऱ्या बाजूला २४ व २५ ऑगस्ट १७८१ रोजी सावंतवाडीकरांच्या ताब्यातील डिचोलीवर आश्चर्यकारकपणे हल्ला केला व एका हल्ल्यात डिचोली स्वतःच्या ताब्यात घेतली.[३८]

या सहज विजयानंतर धैर्य वाढलेल्या पोर्तुगीजांनी सांखळी किल्ल्याला वेढा घातला आणि त्यांनी त्या प्रदेशातील लोकांना आश्वासन दिले की, पोर्तुगीज त्यांच्या परंपरागत सामाजिक व धार्मिक बाबतीत हस्तक्षेप करणार नाहीत. नोव्हेंबर १७८० मध्ये सावंतवाडीकरांनी त्यांच्या पत्रांतून पेशवे दरबारला सूचना देऊनसुध्दा पेशवे दरबारने किंवा महादजी शिंदेने सावंतवाडीकरांना मदत केली नाही. अडचणीत

सापडलेल्या खेम सावंत ३ ने डिचोली व सांखळी परत करावी अशी मागणी करण्यासाठी आपला वकील पोर्तुगीजांकडे पाठविला.[३९]

पोर्तुगीजांनी सावंतवाडीकरांची ही मागणी फेटाळली आणि त्यांनी सावंतवाडीकरांना कळविले की, त्यांनी वार्षिक खंडणी सन १७७४ पासून पोर्तुगीजांना दिलेली नाही व पोर्तुगीजांच्या प्रदेशात अशांतता निर्माण केली. त्यामुळे त्यांनी सावंतवाडीकरांच्या ताब्यातील सांखळी, डिचोली ताब्यात घेतली आहे.

नंतर खेम सावंत ३ ने ख्रिश्चन मिशनऱ्यांना सावंतवाडीमध्ये येऊन ख्रिश्चन धर्मप्रसार करण्यास परवानगी दिली.

अशा रितीने सावंतवाडीकरांनी ख्रिश्चन मिशनऱ्यांचा सावंतवाडीतील प्रवेश स्विकारुन त्यांनी ख्रिश्चनांच्या राजकीय आणि आर्थिक प्रभावाला सावंतवाडीच्या प्रदेशात परवानगी दिली.

**सावंतवाडी पोर्तुगीज तह २९/१/१७८८**

हा तह[४०] पोर्तुगीज गव्हर्नर आणि खेम सावंत ३ यांच्या प्रतिनिधींनी २९/१/१७८८ रोजी केला. या मित्रत्वाच्या व पोर्तुगीजांकडून सावंतवाडीकरांना मिळणाऱ्या संरक्षणाच्या तहात १९ कलमे होती.

१. उभयतांतील मतभेद विसरुन उभयतांत चांगले मैत्रीचे संबंध प्रस्थापित करणे.

२. यापूर्वी सावंतवाडीकर व पोर्तुगीज यांच्यात २९/७/१७५९, २४/१२/१७६१ रोजी झालेले तह या तहाचा पाया मानावेत.

या तहातील सर्व कलमे वेळोवेळी केलेल्या दुरुस्त्यांसह या तहात समाविष्ट असावीत.

३. सावंतवाडीकरांनी त्यांच्या राज्यात ख्रिश्चनांना धर्मप्रसार करण्याचे व आवश्यकता भासल्यास चर्च बांधण्याचे अधिकार असावेत.

४. दोन्ही सत्तांनी आपआपल्या युध्दकैदयांची व शरणार्थींची सुटका करावी (अदलाबदल) पोर्तुगीजांनी ही मागणी मान्य करुन घेतली की, ज्या शरणार्थींना ख्रिश्चन धर्म स्विकारावयाचा असेल त्यांना सावंतवाडीकरांनी तशी परवानगी द्यावी.

५,६,७,८,९ ही कलमे आरमार व व्यापारी जहाजांच्या संदर्भात होती.

पोर्तुगीजांचा परवाना असलेल्या सावंतवाडीकरांच्या आरमारी व व्यापारी जहाजांना पोर्तुगीजांनी मदत करावी. परस्परांनी आपापल्या राज्यातील बंदरे परस्परांच्या व्यापारासाठी खुली करावीत. एवढेच नव्हेतर संख्येने जास्त नसतील तर युध्द जहाजानांही परस्परांच्या बंदरात प्रवेश देण्यात यावा.

पोर्तुगीजांच्या संरक्षणाखाली असणाऱ्या व्यापारी जहाजांना संचाराचा परवाना देण्याचा अधिकार सावंतवाडीकरांना असणार नाही.

१० वे कलम हे खंडणीच्या संदर्भात होते. २४/१२/१७६१ च्या तहानुसार सावंतवाडीकरांनी वार्षिक ४००० आश्रफी पोर्तुगीजांना द्यावी. मागील खंडणी बाकी होती व ती देणे सावंतवाडीकरांना अडचणीचे व त्रासदायक होते. सावंतवाडीकरांच्या विनंतीला प्रतिसाद म्हणून १००० आश्रफी खंडणी कमी करण्यात आली व पूर्वीच्या बाकीत ५० टक्के सूट देण्यात आली.

११ व्या कलमानुसार गोव्याच्या पोर्तुगीज सरकारने सावंतवाडीकरांचे सरंक्षण करण्याचे आश्वासन दिले. पोर्तुगीज सरकारने सावंतवाडीकरांचे तिसऱ्या सत्तेशी संघर्ष झाला तर तो शांततेने मिटविण्याचा व गरज पडली तर लष्करी शक्तीचा अवलंब करुन मिटविण्याचे आश्वासन दिले.

कोल्हापूरकरांची फौज, सावंतवाडीकरांच्या प्रदेशातून हाकलून लावण्यासाठी पोर्तुगीजांनी आपली फौज पाठवून देण्याचे मान्य केले. तसेच कोल्हवपूरकरांच्या आक्रमणाला तोंड देण्यासाठी सावंतवाडीकरांना ५० हजार रुपये देण्याचे पोर्तुगीजांनी मान्य केले.

१३ व्या कलमानुसार पोर्तुगालच्या राणीचे सही नसलेले निवेदनपत्र देण्याची खेम सावंत ३ ला परवानगी देण्यात आली की, ज्यानुसार त्याने पोर्तुगीजांना दिलेला संपूर्ण प्रदेश किंवा प्रदेशाचा कांही भाग परत मागण्याचा अधिकार राहील. (पोर्तुगीजांनी मदत केली नाही तर)

**वरील तहाचे परिणाम**

पोर्तुगीजांनी प्रथम १३ व्या कलमाची अंमलबाजवणी करुन पेडणे महालातील राहिलेला भाग स्वतःच्या ताब्यात ४/१२/१७८८ रोजी घेतला.[४१] आणि दुसऱ्या दिवशी ५/१२/१७८८ रोजी आपले आरमार व फौज कोल्हापूरकरांच्या फौजेविरुध्द पाठविली. गोव्याच्या व्हाईसरॉयने याच दिवशी कोल्हापूरकरांना पत्र पाठविले आणि पेडणे महालाच्या बदल्यात संरक्षण व मैत्रीच्या संबंधात झालेल्या वरील तहाची कल्पना दिली.

पोर्तुगीजांच्या आरमाराने कोल्हापूरकरांच्या मालवण वर आक्रमण करण्यासाठी मार्गक्रमण केले.[४२]

७ फेब्रुवारी १७८८ रोजी पोर्तुगीज सैन्य सतरडे आणि मदुरेमार्गे मालगांवला निघाले. मालगांवला सावंतवाडीकरांची फौज पोर्तुगीज फौजेला मिळाली.

कोल्हापूरच्या आरमाराचा मुक्काम मालंदला होता तोपर्यंत संयुक्त फौजेने वेंगुर्ला किल्ला घेतला व रेडीला वेढा घातला.[४३] छ. शिवाजी तिसरा स्वतः वेंगुर्ला येथे वेढयात सापडला.

संयुक्त फौजेने आणि आरमाराने रेडी किल्ल्याची नाकेबंदी केलेल्या कोल्हापूरकरांच्या फौजेवर आक्रमण केले व त्यांच्या फौजेला मालवण पर्यंत मागे हटविले. कोल्हापूरकरांचे रेडी, निवती आणि वेंगुर्ले यावरील नियंत्रण संपुष्टात आले.[४४]

संयुक्त फौजेने माघार घेणाऱ्या कोल्हापूरकरांच्या फौजेचा पाठलाग केला नाही. छ. शिवाजी ३ ने कुमक पाठवून अधिक मजबूत केलेल्या कोल्हापूरकरांच्या फौजेने सावंतवाडीकरांच्या ताब्यातील अकेरी या ठाण्यावर आक्रमण केले.[४५]

सावंतवाडीचा कारभारी विसाजी महादेव याने ही बातमी पोर्तुगीज व्हाईसरॉयला दिली. पोर्तुगीजांनी अकेरीत कोल्हापूरकरांना हाकलण्यासाठी सावंतवाडीकरांना मदत पाठविली.

आकेरीतून माघार घेणाऱ्या कोल्हापूरकरांच्या फौजेने रामघाटमार्गे पोर्तुगीजांच्या ताब्यातील डिचोली परगण्यावर आक्रमण केले.[४६]

कोल्हापूरकरांना डिचोलीतून पोर्तुगीजांनी डिचोलीची मजबूत व्यवस्था केलेली असल्यामुळे कांहीही अपेक्षित प्रदेश मिळाला नाही.

अशा प्रकारे सावंतवाडी कोल्हापूरकरांच्यातील संघर्ष हा गोवा व कोल्हापूर यांच्यातील संघर्ष बनला. पोर्तुगीजांना सावंतवाडीकरांच्या संरक्षणासाठी यापुढे कोल्हापूकरांशी संघर्ष करण्याची इच्छा नव्हती. सावंतवाडीकरांकडून पेडणे महाल पोर्तुगीजांना मिळाला असल्यामुळे त्याचा राजकीय हेतू सिध्द झाला होता.[४७]

पोर्तुगीज सेक्रेटरीने १७/२/१७८८ रोजी[४८] नारायण शेणवी धुमे या पोर्तुगीजांच्या पुणे दरबारातील वकीलाला पत्र पाठवून त्याला नाना फडणीसाला भेटून कल्पना द्यावयास सांगितले की, पुणे दरबारने कोल्हापूरकरांना उघड मदत करु नये व कोल्हापूरकरांचा नाश करणे हा पोर्तुगीजांचा उद्देश्य नाही.

पोर्तुगीज वकिलाने २३/३/१७८८ च्या[४९] पत्रातून पेशवा माधवराव यांस कळविले की, पोर्तुगीजांनी सावंतवाडीकरांना मदत केली ती कोल्हापूरकरांचा नाश करण्यासाठी नसून कोल्हापूरकर व सावंतवाडी यांच्यात मैत्रीचा तह व्हावा अशा उद्देशाने मदत केली आहे.

मात्र राजकीय फायदयासाठीच पोर्तुगीजांनी सावंतवाडीकरांना मदत केली होती.

छ. शिवाजी ३ ला आपल्या लष्करी आक्रमणाची निष्फळता लक्षात आल्यावर आणि पुणे दरबारने मध्यस्थी केल्यावर कोल्हापूरकरांनी आपली फौज सावंतवाडीकरांच्या राजधानीतून काढून घेतली.

नंतर पोर्तुगीज व्हाईसरॉयने आपली फौज सावंतवाडीतून बाहेर काढली. पण पोर्तुगीज सेक्रेटरीने आपल्या वकिलाला १६/४/१७८८[५०] मध्ये लिहिलेल्या पत्रात पोर्तुगीजांनी तक्रार केली की, पुणे दरबारच्या सूचनेप्रमाणे कोल्हापूरकरांनी मसुरा (भरतगड) हा सावंतवाडीकरांना परत केला नाही.

महादजी शिंदेने आपल्या १/९/१७८८ च्या पत्रातून पोर्तुगीज [५१] गव्हर्नरने खेम सावंत ३ याला मित्रत्वाने मदत केल्याबद्दल समाधान व आनंद व्यक्त केला.

इ.स. १७८८ च्या तहानुसार कोल्हापूरकरांकडून किल्ले परत मिळविण्यासाठी पोर्तुगीजांनी सावंतवाडीकरांना मदत केली नाही. मात्र सन १७८८ च्या तहानुसार पोर्तुगीजांनी सावंतवाडीकरांचा पेडणे महाल पूर्णपणे ताब्यात घेतला होता. अशा रितीने पोर्तुगीजांनी स्वार्थीपणाने तहाचा जो भाग त्यांच्या फायदयाचा होता त्याची फक्त अंमलबजावणी केली.

महादजी शिंदेचा असा समज होता की, पोर्तुगीजांनी सावंतवाडीकरांना कोल्हापूकरांकडून किल्ले परत मिळविण्याच्या कामी मदत केली नाही.

पोर्तुगीजांचा प्रतिपाद्य मुद्दा असा होता की, त्यांनी सावतंवाडीकरांना मदत केली नाही तर कोल्हापूरचे सैन्य सावंतवाडीकरांचा पूर्ण नाश करेल.

कोल्हापूराशी संबंधित समस्या मिटविल्यानंतर खेम सावंत ३ ने आपले लक्ष पोर्तुगीजांकडे वळविले.

डिसेंबर १७९३ मध्ये सावंतवाडीकरांच्या फौजांनी पेडणे महालावर आक्रमण केले आणि कोरेगांव केरी यासारख्या ठाण्यावर नियंत्रण निर्माण केले. पोर्तुगीजांनी जोराचा प्रतिहल्ला करुन सावंतवाडीकरांच्या फौजांना पेडणे महालातून हाकलून दिले तरी त्या फौजांनी सप्टेंबर १७९४ मध्ये फोंडा या पोर्तुगीजांच्या प्रांतात प्रवेश केला.[५२]

अशा प्रकारे १७९४ मध्ये खेम सावंत ३ ला पोर्तुगीजांकडून कांही प्रदेश परत मिळविण्यात यश मिळाले. १२/२/१७९४ रोजी वानवडी येथे महादजी शिंदेचा मृत्यू झाला व खेम सावंत ३ चा फार मोठा तोटा झाला.

### पोर्तुगीज पेडणे महाल विलीन करतात

पोर्तुगीज गर्व्हनरने त्याच्या सेनापतीला पेडणे महाल जिंकून घेण्याची आज्ञा केली. पोर्तुगीज सेनापतीने केवळ ४०० सैन्यांच्या मदतीने पेडणे महाल काबीज केला.

पेशव्याने पोर्तुगीजांचे केलेले संरक्षण व दिलेले उत्तेजन यासाठी कारणीभूत होते. त्यामुळेच पेडणे महाल शेवटपर्यंत पोर्तुगीजांच्या ताब्यात राहिला. शेवटी पेडणे महाल पोर्तुगीजांनी आपल्या राज्यात विलीन करुन टाकला.

### सावंतवाडी कोल्हापूर संबंध

### मोर्चेल प्रकरण

सन १७८५ ते १७९३ हा खेम सावंत ३ च्या राजकीय जीवनातील महत्त्वाचा व शेवटचा टप्पा होय. हयाच कालखंडात मोर्चेलच्या वापरावरुन सावंतवाडीकर खेम सावंत ३ व कोल्हापूकर यांच्यात प्रतिष्ठेचा प्रश्न निर्माण झाला.[५३]

खेम सावंत ३ ला प्रतिष्ठेची बाब असलेला मोर्चेलच्या वापराचा अधिकार हवा होता व त्याच्या प्राप्तीची इच्छा खेम सावंत ३ ने महादजी शिंदे जवळ व्यक्त केली. महादजी शिंदेची पुतणी लक्ष्मीबाई ही खेम सांवत ३ ची पत्नी होती. तेंव्हा दिल्लीचा बादशहा शहा आलम हा महादजी शिंदेच्या नियंत्रणात होता.

महादजी शिंदेने खेम सावंत ३ साठी मोर्चेलची मागणी शहा आलमकडे केल्यावर शहा आलमने मोर्चेल व राजेबहाद्दर हा किताब खेम सावंत ३ ला सन १७८५ मध्ये दिला.[५४] असे अधिकार मुघल बादशहाने दक्षिणेतील टिपू सुलतान, पोर्तुगीज व कोल्हापूरकर छत्रपतींना दिले होते.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

खेम सावंत ३ चे मोर्चेल बळवंतराव रघुनाथ दळवी याने दिल्लीहून आणले म्हणून त्याला खेम सावंत ३ ने रेडी व आखली जवळ बागायती जमीन इनाम देण्यात आली.[५५]

पोर्तुगीजांनी मोर्चेल व राजेबहाद्दर हा किताब बादशहाकडून मिळाला म्हणून खेम सावंत ३ चे अभिनंदन केले.

कोल्हापूरचे छत्रपती शिवाजी तिसरे यांनी पोर्तुगीजांप्रमाणे खेम सावंत ३ चे अभिनंदन केले नाही. उलट या घटनेमुळे त्यांना आपला फार मोठा अपमान वाटला.[५६] सन १७८५ पूर्वीपासूनच सावंतवाडीकर व कोल्हापूरकर यांच्यात राजकीय संघर्ष होताच. मोर्चेलमुळे हा संघर्ष तसाच पुढे चालू राहण्यास कारण मिळाले.

कोल्हापूकरांनी पेशवा माधवरावाकडे तक्रार केली की, मोर्चेल व राजेबहाद्दर ही पदवी वापरण्याचे अधिकार कोल्हापूरकर छत्रपतींचे आहेत हे अधिकार खेम सावंत ३ ला मिळणे म्हणजे कोल्हापूरकर छत्रपतींचे अधिकारावर अतिक्रमण आहे.[५७]

कोल्हापूर छत्रपतींनी म्हणून सावंतवाडीकरांची सत्ता संपुष्टात आणण्याचा निर्णय घेऊन स्वतः प्रसिध्द गडावर आक्रमण केले.[५८]

इ.स. १७८७ च्या सुरुवातीस पुणे दरबारने खेम सांवत ३ ला असा सल्ला दिला की, करवीर प्रांतात दंगाधोपा करु नये शिवाय असे आश्वासन दिले की, सावंतवाडीकर व कोल्हापूरकर यांच्यातील प्रश्न पेशवे दरबाराकडून सोडविले जातील.[५९]

असे प्रयत्न मात्र पुणे दरबारने केले[६०] नाहीत फक्त १२/३/१७८७ रोजी पेशवे दरबारने पोर्तुगीजांना एक पत्र पाठविले की, पोर्तुगीजांनी पेडणे, सांखळी व डिचोली हे

महाल सावंतवाडीकरांना परत द्यावेत. गोवेकर पोर्तुगीजांनी सावंतवाडीकरांचा लष्करी कारवाईने प्राप्त केलेला प्रदेश परत करण्यास स्पष्ट शब्दात नकार दिला. पोर्तुगीज व्हाईसरॉयने हे निदर्शनास आणून दिले की, या लष्करी कारवाईची जबाबदारी सावंतवाडीकरांकडे जाते.[६१]

अशा रितीने पुणे दरबारने सावंतवाडीकरांची एकही समस्या सोडविली नाही. शिवाय त्यांच्या एका पत्रामुळे पोर्तुगीज सावंतवाडीकरांना प्रदेश त्यांना परत देण्याची शक्यता नव्हती.

**कोल्हापूरकर/पेशवे यांची सावंतवाडीकरांवर संयुक्त आक्रमणे**

पुणे दरबारने नाना फडणीसाच्या नेतृत्वाखाली कोल्हापूरकरांशी समझोता (तह/करार) करुन हरीपंत फडकेंच्या नेतृत्वाखाली कोल्हापूरकर व पेशवे यांची मोठी फौज सावंतवाडीकरांच्या विरुध्द एकत्र आली.

पेशवे व कोल्हापूरकरांच्या संयुक्त फौजेने सावंतवाडीकरांच्या प्रदेशावर हल्ला केला आणि एप्रिल १७८७ मध्ये नरसिंहगड जिंकला. पुढे संयुक्त फौजेने हेरे, ठाणे, गंधर्वगड, रांगणा, निवती आणि वेंगुर्ला ही ठिकाणी जिंकली.[६२]

या संयुक्त फौजेच्या आक्रमणापुढे सावंतवाडीकर खेम सावंत ३ राजकीयदृष्टया एकाकी पडला.

कोल्हापूरकरांच्या आक्रमणापुढे सावंतवाडीकरांची अवस्था अनिश्चिततेची बनली. कारण पेशव्यांच्या सैन्याने कोल्हापूरकरांना मदत केली होती आणि ज्याने मदत केली असती असा महादजी शिंदे अशा आणीबाणीच्यावेळी दूर उत्तरेत होता. त्यामुळे सावंतवाडीकरांची स्थिती शोचनीय झाली.

जयाप्पा शिंदेची विधवा व खेम सावंत ३ ची सासु सखुबाईने पोर्तुगीजांना पत्र पाठवून कोल्हापूरकरांच्या विरोधात सावंतवाडीकरांना मदत करण्याची विंनती केली.[६३]

खेम सावंत ३ ने स्वतः पोर्तुगीजांना इ. स. १७८८ मध्ये पत्र लिहून २५ पिंपे दारुगोळा पावडर, १५०० बंदुका आणि २५०० रुपयेची रोख मदत कोल्हापूरकरांनी केलेल्या अकारण आक्रमणाचा प्रतिकार करण्यासाठी मागितली.[६४]

पोर्तुगीजांनी सखुबाईच्या किंवा खेम सावंत ३ च्या पत्रांचा सहानुभूतीने विचार केला नाही. पोर्तुगीजांच्या हे लक्षात आले होते की, सावंतवाडीकर राजकीयदृष्टया पूर्णपणे एकाकी पडलेले असून मोठया अशा आक्रमणाचा प्रतिकार करीत आहेत. पोर्तुगीजांना असेही वाटत होते की, कोल्हापूरकरांनी सावंतवाडीकरांचा पूर्ण पराभव करुन पोर्तुगीजांच्या आसपासच्या प्रदेशात वर्चस्व वाढवावे. सावंतवाडीकरांचा पूर्ण पराभव होऊ नये म्हणून त्यांना सक्रिय मदत करण्याची आवश्यकता पोर्तुगीजांना वाटत होती. पण त्याचेवळी सावंतवाडीकरांकडून प्रदेशिक प्राप्ती व्हावी असेही पोर्तुगीजांना वाटत होते.

कोल्हापूरकरांनी हे ओळखले होते की, अशा आणीबाणीच्या प्रसंगी फक्त पोर्तुगीज सावंतवाडीकरांना मदत करु शकतात. म्हणून कोल्हापूरच्या छ. शिवाजी ३ ने पोर्तुगीजांना अशी विनंती केली की, एकतर त्यांनी कोल्हापूरकरांना मदत करावी अन्यथा तटस्थ रहावे.[६५]

खेम सावंत ३ चा वकील विसाजी महादेव यांच्या पोर्तुगीज व कोल्हापूकर यांच्या प्रतिनिधींच्या भेटी झाल्याचे जेंव्हा लक्षात आले तेंव्हा त्याच्या परिस्थितीचे गांभीर्य

लक्षात आले व त्याने पोर्तुगीजांशी बोलणी करण्याची तारीख निश्चित केली. अशा रितीने युध्दात भाग घेणाऱ्या दोघांनी पोर्तुगीजांशी संपर्क साधला.

कोल्हापूरकरांना मनस्वी वाटत होते की, पोर्तुगीजांनी तटस्थ रहावे तर सावंतवाडीकरांना वाटत होते की, पोर्तुगीजांनी आपणास मदत करावी.

पोर्तुगीजांची सावंतवाडीकरांना मदत करण्याची इच्छा होती. शिवाय परंपरागत निष्ठेशी सावंतवाडीकरांना बांधून ठेवण्याचीही इच्छा होती. म्हणून त्यांनी सावंतवाडीकरांचा वकील विसाजी महादेव यास कळविले की, जर सावंतवाडीकर पोर्तुगीजांशी कायमचा मैत्री तह करणार असतील तर पोर्तुगीजांची मदत करण्याची इच्छा आहे.

सावंतवाडीकरांना दारुगोळा, गण पावडर व हत्यारे हवी होती. तसेच कोल्हापूरकरांच्या आक्रमणामुळे दुर्बल झाल्यामुळे पोर्तुगीजांच्या मदतीची आवश्यकता होती.

पोर्तुगीज व सावंतवाडीकर यांच्यात बोलणी चालू होती तेंव्हा कोल्हापूरकरांचा सावंतवाडीकरांवरील लष्करी दबाव वाढत होता.

कोल्हापूरकर सैन्याने कुडाळ भागात नव्याने हल्ला केला आणि २०/१/१७८८ रोजी त्यांचे सैन्य माणगावला पोहोचले.[६६]

याचवेळी छ. शिवाजी ३ ने राजकीय खेळी अशी केली की, हरीपंत फडके या प्रसिध्द सरदाराच्या थोरल्या मुलाला पुणे दरबाराने मुखत्यार म्हणून नेमले. त्यामुळे पुणे दरबारचे अगदी मैत्रीचे संबंध कोल्हापूकरांशी तयार झाले. यावेळी सावंतवाडीकरांना

पुणे दरबारकडून कांही मदत मिळाली नाही. त्यामुळे पोर्तुगीजांशी तह करण्याशिवाय सावंतवाडीकरांजवळ दुसरा पर्याय नव्हता.

माणगांवला पाठविलेल्या कोल्हापूरकरांच्या सैन्याने भरतगडला वेढा दिला आणि वेटलगडजवळ सावंतवाडीकरांच्या सैन्याचा पराभव केला.

खेम सांवत ३ ने या परिस्थितीची कल्पना आपली सासू सखुबाई हिला दिली म्हणून महादजी शिंदेने पेशवे दरबारला पत्र पाठवून सावंतवाडीकरांना मदत करण्यास सांगितले. पेशवे दरबारने नाना फडणीसाच्या नेतृत्वाखाली दुहेरी धोरणाचा अवलंब केला. एका बाजूला त्यांनी महादजी शिंदेला कळविले की, आम्ही सावंतवाडीकरांना मदत पाठवित आहोत व दुसऱ्या बाजूला सावंतवाडीकर व कोल्हापूकर यांच्या संघर्षात ते तटस्थ राहिले.

सन १७८३ मध्ये पोर्तुगीजांनी सावंतवाडीकरांचा डिचोली, सांखळी, पेडणे व हर्लोर्ना किल्ला जिंकून घेतला होता.[६७] या प्रदेशावरील हक्क सोडून देण्यास जर सावंतवाडीकर तयार असतील तर पोर्तुगीज सावंतवाडीकरांना मदत करण्यास तयार होते.

जरी वरील प्रदेशावरील सावंतवाडीकरांचे प्रत्यक्ष नियंत्रण संपलेले असले तरी या प्रदेशावरील हक्क कायमचा सोडण्याची सावंतवाडीकरांची इच्छा नव्हती. म्हणून पोर्तुगीजांनी पेडणे महालावर हल्ला करण्याची धमकी सावंतवाडीकरांना दिली.[६८]

त्यामुळे बुडणारा मनुष्य जसा सापाला पकडतो (आधार घेतो) त्याप्रमाणे सावंतवाडीकरांनी पोर्तुगीजांची मदत घेतली आणि त्यांच्या मागण्या मान्य केल्या.

सावंतवाडीकर पोर्तुगीजांच्या पेडणे महालातील आक्रमणाला तोंड देऊ शकले नाहीत. कारण त्याचवेळी सावंतवाडीकर कोल्हापूकरांच्या कुडाळमधील आक्रमणाला तोंड देत होते. त्यामुळे खेम सावंत ३ ने पोर्तुगीजांनी केलेल्या सूचनांचा स्विकार करुन त्यांच्याशी तह केला.

**सावंतवाडीकर/इंग्रज संबंध**

सन १७६५ नंतर इंग्रजांनी मालवण व सिंधुदुर्ग हे जलदुर्ग घेऊन आपली स्थिती भक्कम केली होती. सिंधुदुर्गचे त्यांनी ऑगस्टस् असे नांव ठेवले.[६९]

बंदरावर सावंतवाडीकरांकडून झालेल्या चाचेगिरीचा आरोप करुन इंग्रजांनी मेजर गॉर्डन व वॅटसन यांच्या नेतृत्वाखाली आरमारी मोहिम काढली.[७०] ६ मार्च १७६५ रोजी पाठविलेल्या आरमाराने रेड्डीजवळील यशवंतगड किल्ल्यावर हल्ला केला व ९ मार्च १७६५ रोजी किल्ला ताब्यात घेतला. रांगणा ते मालवण हा प्रदेश आरमारी बंदरासह इंग्रजांच्या ताब्यात द्यावा अशी इंग्रजांनी सावंतवाडीकरांकडे मागणी केली.[७१]

इंग्रजांच्या या जाचक मागण्या मान्य करण्यास खेम सावंत ३ तयार नव्हता.[७२] म्हणून इंग्रजांनी सावंतवाडीकरांच्या ताब्यातील भरतगड घेण्यासाठी आपल्या फौजा पाठविल्या. इंग्रजांच्या या वाढत्या दबावामुळे खेम सावंत ३ हा इंग्रजांशी तह करावयास तयार झाला व ७/४/१७६५ रोजी रेडी या ठिकाणी तहावर सहया केल्या.

तहातील दुसऱ्या कलमानुसार खेम सावंत ३ याने कार्ली व सालसी या नद्यांच्यामधील प्रदेश व स्थावर मालमत्ता इंगजांना दिली आणि समुद्र किनाऱ्यापासून किल्ल्यापर्यंतच्या जमीनीवरील हक्क ईस्ट इंडिया कंपनीला दिला. शिवाय नुसकान भरपाई म्हणून एक लाख रुपये देण्याचे मान्य केले.

११ व्या कलमानुसार सावंतवाडीकरांना एकही लढाऊ जहाज अगर गलबत ठेवता येणार नव्हते.

त्यात आणखी अशी तरतूद होती की, जर कोल्हापूकरची राणी जिजाबाई महाराज यांच्याबरोबर इंग्रजांचा संघर्ष झाला तर सावंतवाडीकरांनी इंग्रजांना मदत करावी.

त्यात आणखी एक कलम असे होते की, इंग्रजांना आयात निर्यातीचे अधिकार देण्यात आले व सावंतवाडीत वखार सुरु करण्यास परवानगी मिळाली.

तहातील १३ व्या कलमानुसार खेम सावंत ३ ला भरतगड हा रेडी किल्ल्याच्या बदल्यात तहापासून ८ दिवसांच्या आत ईस्ट इंडिया कंपनीला देण्याचे मान्य करावे लागले.

अशा रितीने रेडी किल्ल्याच्या बदल्यात भरतगड (मसुरा) ताब्यात घेऊन १/५/१७६५ रोजी इंग्रज आरमार मुंबईस परत आले.[७३]

कोल्हापूरच्या जिजाबाई या राणीने पेशव्यांना सावंतवाडीकरांना मदत करावी असे कळवूनदेखील अशा अडचणीच्यावेळी पेशव्यांनी सावंतवाडीकरांना मदत केली नाही.

कोल्हापूरच्या जिजाबाई राणीने इंग्रजांच्या सावंतवाडीतील वाढत्या हस्तक्षेपास पायबंद घालण्यासाठी जिवाजी विश्राम सबणीस या कारभाऱ्यासही प्रोत्साहन दिले.[७४]

कोल्हापूरकरांचा विरोध लक्षात येताच इंग्रजांनी कोल्हापूरकरांशी १२/१/१७६६ ला तह केला.

शेजारच्या कोणत्याच सत्तेचा पाठींबा नसलेली सावंतवाडी पुन्हा एकदा इंग्रजांच्या आक्रमकतेची लक्ष्य बनली.

थॉमस् ऑस्टीन हा मुंबईहून मालवण येथे ४/१०/१७६६ रोजी कमांडीग ऑफीसर म्हणून आला आणि त्याने कोल्हापूर व सावंतवाडी यांच्या लष्करी हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवले. २४/१०/१७६६ रोजी रेडी येथे त्याने सावंतवाडीकरांशी तह केला.[७५]

इ. स. १७६६ च्या या नवीन तहाने एका बाजूला सावंतवाडीकरांनी नुसकान भरपाई म्हणून द्यावयाची रक्कम २ लाख रुपये करण्यात आली आणि दुसऱ्या बाजूला २ लाखांपैकी पहिला हप्ता म्हणून ८० हजार रुपये सावंतवाडीकर इंग्रजांना देतील तेंव्हा रेडी किल्ला इंग्रज सावंतवाडीकरांना देतील असे ठरले.

तहातील कलम १४ प्रमाणे १३ वर्षेपर्यंत वेंगुर्ला जिल्हा व गावे ही जोपर्यंत सर्व रक्कम (नुसकान भरपाई) दिली जात नाही तोपर्यंत ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यात रहातील असे ठरले.

या वेळेत पेशव्यांना सावंतवाडीकरांना व कोल्हापूरकरांना मदत करण्यात अपयश आल्याने पश्चिमी बंदरावर इंग्रजांना अधिसत्ता स्थापन करता येणे शक्य झाले.

इंग्रजांनी मालवणला वखार इ .स. १७९२ ला उघडली. ती दिवसेंदिवस तेजीतच होती. व्यापाऱ्याच्या निमित्ताने इंग्रज मालवणला येऊ लागले. वखारीत वस्तीस राहू लागले. हळूहळू मालवणची माहिती घेऊ लागले. लोकस्थिती अजमावू लागले. त्यांचा मुख्य उद्देश्य जो 'वसूल घेणे' त्याचाही अंदाज करु लागले. त्यासाठी मालवणला होणारे पीक पाणी, उत्पन्न यांचा तपास करु लागले. मालवणचे उत्पन्न त्यांच्या लक्षात

आले लोक पाहिले, त्यांची मने अजमावली आणि कोण किती आपल्या उपयोगी पडेल याबद्दलचे अंदाज कंपनी सरकारला कळविले. राजाने परकीय सत्तेला मालवण अर्पण केले. मालवणवासियांनी हा बदल मुकाटयाने सहन केला.

इंग्रजांनी मालवणात आपला अंमल बसविण्यास ताबडतोब सुरुवात केली. मालवण ताब्यात आल्यावर तेथे आपली फौज ठेवली. मालवणचा महाल बनविला. या महालाला लागूनच सावंतांचा प्रदेश होता. तो घशाखाली घालण्यासाठी माणसे जमविली. सावंतवाडीकरांशी नाना कुरापती काढल्या, निरनिराळे बरेवाईट राजकीय डाव खेळले आणि सावंतवाडीला अखेरीस आपल्या वाढत्या सत्तेपुढे नमावयास लावले. सावंतवाडीकरांनी इंग्रजांचे मांडलिकत्व १८१८ मध्ये पत्करले. त्यामुळे इंग्रजांच्या दक्षिण कोकणातील उद्योगाचे केंद्र जे मालवण तेथील त्यांचे कार्य समाप्त झाले.[७६]

खेम सावंताची विधवा पत्नी लक्ष्मीबाईने श्रीराम सावंताच्या रामचंद्र सावंत या मुलास दत्तक घेतले होते. त्याचा ७/१०/१८०८ रोजी झोपेतच निघृर्ण खून झाला.[७७] आणि त्याचवर्षी लक्ष्मीबाईचाही मृत्यू झाला.[७८]

अशा घटनांनी सावंतवाडीकरांच्या अंतर्गत परिस्थितीत बदल घडले. तेंव्हा खेम सावंत ३ ची दुसरी विधवा पत्नी दुर्गाबाई हिने सावंतवाडीचा कारभार हाती घेतला. तिने श्रीराम सावंतकडून सन १८०५ मध्ये[७९] पराभूत झाल्याने प्रथम कुडाळला व तेथून महाडला पळून गेलेल्या फोंड सावंतास यास बोलावून घेतले व त्याला सावंतवाडीच्या गादीवर १८०९ मध्ये बसविले.[८०]

त्यानंतर भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील सत्ता स्पर्धा बरीच वर्षे चालू राहिली. कोल्हापूरकरांचे १७८५ ते १७९३ च्या कालखंडातील मोर्चेल युध्द तसेच चालू राहिले.

पोर्तुगीजांसारख्याकडून मदत घेणाऱ्या सावंतवाडीकरांना संपुष्टात आणणे कोल्हापूकरांना जमले नाही. तसेच कोल्हापूकर सावंतवाडीकरांतील आक्रमणे पेशवे सरकारलाही थांबविण्यात यश मिळाले नाही. परिणामी परस्परांवरील आक्रमणामुळे सावंतवाडीकर व कोल्हापूरकर दोघेही दुर्बल बनत गेले.

कोल्हापूरकरांनी इंग्रजांकडे तक्रार केली की, सावंतवाडीकरांनी भारतगड कोल्हापूकरांना परत करावा.[८१]

२६/३/१८१२ रोजी एल्फीस्टनने दुर्गाबाईस भारतगड ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यात द्यावयास सांगीतले. दुर्गाबाईने भारतगड कंपनीच्या ताब्यात दिला की जो इंग्रजांनी कोल्हापूरकरांच्या ताब्यात दिला.[८२]

पुढे कोल्हापूरकरांची स्थिती अधिकच दुर्बल होत गेली आणि कंपनीने १/१०/१८१२ रोजी कोल्हापूकरांवर एक तह लादला. ज्यामुळे परकीय संबंधासारखी महत्त्वाची बाब इंग्रजांच्या ताब्यात जाऊन कोल्हापूरचे राज्य कंपनीचे मांडलिक बनले.[८३]

या तहानंतर दोनच दिवसांची ३/१०/१८१२ रोजी कंपनी व सावंतवाडीकर यांच्यात तह झाला. त्यानुसार सावंतवाडीकरांच्या ताब्यातील निवती, रेडी आणि वेंगुर्ला ही कंपनीच्या ताब्यात आली.

पुढे इंग्रजांनी मसुरे, मालंद व वराड हे तीन तर्फ स्वतःच्या ताब्यात घेऊन त्याचा प्रशासनासाठी एक जिल्हा बनविला. त्याला मालवण हे नांव देण्यात आले व मालवणचा रेसिडेंट हा त्या जिल्हयाचा प्रमुख रहाणार होता.

कंपनीने कार्ली नदीतून जाणाऱ्या येणाऱ्या[८४] मालावर जकात घेणे सुरु केले. पुढे कंपनीने कार्ली नदीच्या किनाऱ्यावरील महसूल जमा करण्याचा अधिकार मागितला. हतबल दुर्गाबाईला कंपनीची ही अन्याय्य मागणीदेखील मान्य करावी लागली.

**सावंतवाडी अंतर्गत कलह**

कांही प्रदेश इंग्रजांच्या ताब्यात गेल्याने सावंतवाडीकरांचे महसुली उत्पन्न कमी झाले. सावंतवाडीकरांचा दुबळेपणा व इंग्रजांचा वाढता हस्तक्षेप यामुळे सावंतवाडीतील महत्वाकांक्षी सरदारांनी दुर्गाबाईस विरोध करावयास सुरुवात केली. प्रथम विरोध श्रीराम सावंतची पत्नी व रामचंद्र सावंतची आई दादीबाईने केला. तिला चंद्रोबा सावंत या सुभेदाराचा पाठींबा होता.[८५]

उलटपक्षी दुर्गाबाईला संभाजी सावंत आणि बबन गोपाळ यांचा पाठींबा होता. अशा प्रकारे सावंतवाडीकरांच्या सरदारांची दोन गटात विभागणी झाली.

या काळात दुर्गाबाईने पोर्तुगीज व इंग्रज या दोन परकीय सत्तांशी सलोख्याचे संबंध ठेवण्यात यश मिळविले होते.

जुलै १८१५ मध्ये दुर्गाबाईच्या कर्मचाऱ्यांनी इंग्रजांच्या एका शिपायास पकडले व तुरुंगात टाकले. ही बातमी एल्फिन्स्टनकडे पोहचल्यावर तुरुंगात टाकलेली व्यक्ती ईस्ट इंडिया कंपनीची कारकून आहे तरी त्वरीत त्याची मुक्तता करावी अशी एल्फिन्स्टनने दुर्गाबाईकडे मागणी केली. दुर्गाबाईने या इंग्रज शिपायास मुक्त करण्यास विरोध केला-नकार दिला. पण एल्फिन्स्टनने सावंतवाडीकरांविरुध्द कडक कारवाई करण्याची धमकी देताच दुर्गाबाईस इंग्रज शिपायाची मुक्तता करावी लागली.

त्यावेळी इंग्रजांविरुध्द सावंतवाडीकरांना मदत करण्यासाठी कुणीही नसल्यामुळे विशेष करुन इंग्रजांशी दुर्गाबाईला नरमाईचे धोरण स्विकारावे लागले.

जुलै ३१, १८१५ रोजी चंद्रोबा सुभेदारांना सावंतवाडीकरांच्यावतीने इंग्रजांना पत्र लिहून इंग्रजांनी सावंतवाडीकरांच्या संदर्भात सहानुभूतीचे धोरण स्विकारावे अशी विनंती केली व या गोष्टीस इंग्रजांनीही मान्यता दिली.

अशा धोरणी व मुत्सद्दी दुर्गाबाईचा मृत्यू १७/१/१८१९ मध्ये झाला. यानंतर नर्मदाबाई व सावित्रीबाई या दोन राण्यांनी इंग्रजांशी १७/२/१८१९ रोजी तह केला व इंग्रजांचे अधिपत्य मान्य केले. पुढे इंग्रजांनी दक्षिण कोकणचा मुलुख मुंबई इलाख्यास जोडला.

**कोकणातील पेशवे-इंग्रज संघर्ष**

**माधवराव व इंग्रज**

पानिपतपूर्वी सुमारे ५० वर्षे मराठयांची सत्ता हिंदुस्थानातील तत्कालीन सर्व सत्तांपेक्षा वरचढ मानली जात होती. त्या काळात दिल्लीच्या बादशहापासून सामान्य नबाव जहागिरदारांपर्यंत सर्वजण त्यांच्या मैत्रीची व सहाय्याची अपेक्षा करीत होते. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात प्रबळ झालेले इंग्रज पानिपतच्या युध्दापूर्वी मराठयांना दबून असत. मराठयांशी व्यापार वाढावा व सलोख्याचे संबंध रहावेत म्हणून त्यांनी पहिल्या बाजीरावाच्या व नानासाहेब पेशव्याच्या कारकिर्दीत पुणे दरबारशी मैत्रीचे तह केले होते. पण पानिपतच्या पराभवानंतर मराठेशाहीचे जे दोष उघडे पडले त्यांची जाणीव इंग्रजांसारख्या धूर्त पाश्चिमात्यांना सर्वाआधी झाली आणि त्याचा फायदा उठविण्यासाठी तेच प्रथम पुढे सरसावले. त्यांनी आपल्या अनेक कारवाया सुरु केल्या.

इंग्रजांच्या या कारवाया चालू असता, थोरल्या माधवरावांच्या नेतृत्वाखाली मराठेशाही कांही काळ तरी सावरली. या अनपेक्षित घटनेने इंग्रज कांहीसे चकीत झाले आणि मराठयाविरुध्दचा आपला हात त्यांनी थोडा आखडता घेतला. तथापि पेशवेपदासाठी राघोबा-माधवराव यांच्यात चाललेल्या कलहाचा लाभ उठविण्याचा त्यांचा अंतस्थ इरादा होताच. इंग्रजांतर्फे एकाचवेळी माधवरावांकडे मॉस्टीन तर राघोबाकडे ब्रोम हे दोघे स्वतंत्रपणे बोलणी करीत होते. याचा अर्थ उघड होता. परंतु राजकारणी बोलणी करीत घोळ घालण्यात मॉस्टीन व माधवराव परस्परास पुरुन उरणारे होते. इ.स. १७६७-६८ मध्ये मॉस्टीनची व माधवरावांची खूप बोलणी झाली. पण कोणीही कोणास दाद दिली नाही. आणि कोणताही महत्त्वाचा करार झाला नाही. मॉस्टीन रिकाम्या हाताने मुंबईस परत गेला. पण फेब्रुवारी १७७२ मध्ये तो पुन्हा पुण्यास आला. आम्हास दुसरे कांही नको, फक्त पुण्यास इंग्रजांचा कायम वकील राहू द्या. अशी त्याने माधवरावांस विनंती केली. माधवरावांस यात कांही वावगे वाटले नाही व त्याने ऑक्टोबर १७७२ मध्ये इंग्रजांच्या पुण्यातील कायम वकिलातीस मान्यता दिली.

माधवरावानंतर नारायणराव पेशवा झाला. त्याच्या छोटया कारकिर्दीत मॉस्टिन माधवरावाच्या परवानगीचे निमित्त सांगून मैत्रीच्या बहाण्याने पुण्यास मुक्काम ठोकून होता. परंतु याच काळात इंग्रजांनी विश्वासघाताने वसईपासून रत्नागिरीपर्यंत मराठयांच्या सर्व सागरी ठाण्यांवर आरमारी हल्ले सुरु केले.[८६]

## रघुनाथराव व इंग्रज

३० ऑगस्ट १७७३ रोजी नारायणराव पेशव्याचा खून झाला. त्यानंतर रघुनाथराव पेशवा झाला. पेशवा झाल्याबरोबर त्याला प्रथम बाहेरच्या शत्रूनां

तोंड द्यावे लागले आणि नंतर अंतर्गत शत्रूंना. राघोबाने पेशवेपदाची प्राप्ती होताच, मुधोजीचा पुत्र रघुजी यास नागपूर राज्याच्या सेनासाहेबीची वस्त्रे दिली. त्यातून निजामाशी उद्‌भवलेल्या लढाईत राघोबाची सरशी झाली. त्यानंतर पुण्यातील गोंधळाच्या परिस्थितीचा फायदा घेऊन मराठयांचा दक्षिणेतील मुलूख गिळंकृत करणाऱ्या म्हैसूरच्या हैदर अलीकडे राघोबा वळला. हैदराप्रमाणे इंग्रजांनीही सप्टेंबर १७७३ ला मराठयांचे तंजावरचे राज्य बळकावले होते.

दरम्यानच्या काळात राघोबा विरुध्द 'बारभाईचे कारस्थान' रचण्यात आले. राघोबाच्या अनेक पाठीराख्यांचा त्यात समावेश होता.

पुण्यात आपणास कोणाचीही मदत नाही आणि पेशवाईचा वारस जन्मल्यानंतर तर आपणास कोणीच विचारत नाही हे पाहून राघोबा पुण्यातून पळून उत्तरेकडे चालला. आपल्या बाजूला कोणी येऊन मिळते काय, याचा अंदाज घेत ठिकठिकाणी हिंडू लागला. राघोबाला सुरुवातीला सामील झालेली पुरंदरे, मेंहदळे, दरेकर इ. मंडळी त्याची बाजू कमकुवत होत असल्याचे दिसताच त्याला मध्येच सोडून गेंली. मग राघोबा शिंदे-होळकर आपल्याला पाठींबा देतात काय हे पहाण्यासाठी इंदूर-उज्जयनिकडे गेला. शिंदे-होळकरांना पुण्याच्या कारभाऱ्यांबद्दल मनातून अढी वाटत असली तरी, खुनी राघोबाच्या पक्षाला मिळून नसत्या भानगडीत पडण्याची त्यांची तयारी नव्हती. शिवाय कारभाऱ्यांच्यावतीने हरिपंत फडके हा मोठी फौज घेऊन राघोबला पकडण्यासाठी त्याचा पाठलाग करीत होता. त्याच्याबरोबर लढाई करण्याचे शिंदे-होळकरांच्या मनात नव्हते. म्हणून राघोबास आश्रय देण्याचे त्यांनी नाकारले. हरिपंताच्या तावडीत सापडू नये म्हणून राघोबा धारच्या पवारांकडे गेला. पवाराने फक्त गरोदर आनंदीबाईला आश्रय देऊन राघोबाची ब्याद काढून लावली. बडोदयाचा

गोविंदराव गायकवाड राघोबाचा पक्षपाती, पण त्याच्याजवळ ना सैन्य ना पैसा, त्याने राघोबाला इंग्रजांची मदत घेण्याचा सल्ला देऊन गुजराथेतील इंग्रजांकडे जाण्याची त्याची सोय लावून दिली. त्याच्या मदतीने राघोबा सुरतेच्या इंग्रजांकडे आश्रयासाठी गेला.

मराठयांच्या अंतर्गत राजकारणात आपले बोट शिरकाविण्याच्या ज्या संधीची इंग्रज बराच काळ वाट पहात होते ती आपण होऊन त्यांच्याकडे राघोबाच्या रुपाने चालून आली. राघोबा पेशव्यांच्याच घरचा असल्याने, पेशवाईवर त्याचा हक्क सांगून मराठयांशी संघर्ष सुरु करणे इंग्रजांना शक्य होते. म्हणून सुरतेच्या इंग्रजांनी त्याला मोठया तत्परतेने आश्रय दिला. त्यामुळे मराठयांच्या इतिहासाला एक वेगळीच कलाटणी मिळाली.[८७]

**इंग्रजांची इच्छा**

मुंबईला लागून असलेली साष्टी, वसई, करंजा ही बेटे आपल्या ताब्यात असावीत असे इंग्रजांना फार पूर्वीपासून वाटत होते. त्या भागातून उपलब्ध होणाऱ्या कच्च्या मालाच्या जोरावर मुंबईचा व्यापार भरभराटीस आणता येईल असे मुंबईकर इंग्रजांचे मत होते. याकाळी कलकत्तेकर व मद्रासकर इंग्रजांना भरपूर नफा मिळत होता तर मुंबईकरांचा व्यापार तोटयात चालला होता. साष्टी, वसई इ. प्रदेश आपल्या हातात आल्यास व्यापाराच्या बाबतीत मद्रासकर व कलकत्तेकर इंग्रजांच्या बरोबरीने आपण राहू शकू असे मुंबई कौन्सिलचे मत होते. शिवाय साष्टी वसई ताब्यात आल्यास हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर मुंबईला लागून एक सलग प्रदेश मुंबईकर इंग्रजांच्या स्वामीत्त्वाखाली आला असता आणि त्यांना लष्करीदृष्टया आपले संरक्षण करणे सोपे गेले असते. या सर्व कारणांमुळे साष्टी व वसई आपल्या ताब्यात आणण्याची धडपड

मुंबईकरांनी सुरु केली. थोरल्या माधवरावाच्या काळात शांततेच्या वाटाघाटींच्या मार्गाने आपले उद्दिष्ट साध्य करण्याचा त्यांनी प्रयत्न केला पण त्यात त्यांना यश आले नाही.

नारायणराव पेशव्याच्या खुनानंतर पुण्यात जी गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली तिचा फायदा उठवून साष्टी आपल्याला हल्ला करुन घेता येईल व पुणे दरबार राघोबा प्रकरणात गुंतला असल्याने, त्याच्याकडून फारसा विरोध होणार नाही असा सल्ला इंग्रज वकील मॉस्टीन याने मुंबई कौन्सिलला दिला. मध्यंतरी राघोबा सुरतेस आश्रयास आल्यास, त्याच्याशी वाटाघाटी करुन साष्टी पदरात पाडून घेण्याचा मुंबईकर इंग्रजांनी प्रयत्न केला. पण या वाटाघाटी चालू असतानाच पोर्तुगीज आक्रमण करणार अशी बातमी मुंबई कौन्सिलला मिळाली. तेंव्हा वेळ न घालविता कौन्सिलने ९/१२/१७७४ रोजी रॉबर्ट गॉर्डन याच्या हाताखाली ६२० गोरे शिपाई, एक हजार काळे शिपाई, तोफखाना व २०० गोलंदाज देऊन त्याला खुष्कीच्या मार्गाने ठाण्यावर हल्ला करण्यास पाठविले. त्याच्या मदतीला कॅप्टन वॅटसनने जलमार्गाने हल्ला चढवावा असे ठरले. त्याप्रमाणे दोघांनी ठाण्याच्या किल्ल्यावर हल्ले चढविले. किल्लेदाराने तीन आठवडे शर्थीने किल्ला झुंजविला. पण राघोबाच्या संघर्षात गुंतलेल्या पुणे दरबाराकडून कांहीच मदत न मिळाल्याने २९/१२/१७७४ रोजी ठाण्याचा किल्ला इंग्रजांच्या ताब्यात आला. इंग्रजांनी करजां, उरण इ. ठाण्याजवळचा प्रदेश जिंकून साष्टी बेट आपल्या ताब्यात आणले.[८८]

## सुरतेचा तह

राघोबा इ.स. १७७५ च्या सुरुवातीस इंग्रजांकडे गेला. त्यानंतर मॉस्टीन, गॅबियर वगैरे ब्रिटीश अधिकाऱ्यांशी त्याच्या वाटाघाटी होऊन ६ मार्च १७७५ रोजी त्याचा इंग्रजांशी तह झाला. या तहास 'सुरतेचा तह' असे म्हणतात. हा तह करताना

राघोबा हा पेशवेपदाचा खरा वारस आहे, पुण्याचे कारभारी कुणा नकली मुलाच्या नावाने सत्ता बळकावून बसले आहेत. अशी राजनैतिक भूमिका इंग्रजांनी घेतली. राघोबाला पेशवेपदावर बसविण्यासाठी अडीच हजार सैन्य, पुरेसा दारुगोळा व तोफखाना यांची मदत पुरविण्याचे सुरतेच्या तहाने इंग्रजांनी मान्य केले. त्याबद्दल राघोबाने सैन्याच्या खर्चासाठी दीड लाख रुपये दरमहा आगाऊ दिले पाहिजेत तसेच ६ लाख रुपये रोख रक्कमेने किंवा जवाहिरांच्या रुपाने अनामत म्हणून ठेवले पाहिजेत अशा अटी इंग्रजांनी घातल्या. त्या मान्य करुन राघोबाने ६ लाखाचे जवाहीर इंग्रजांच्या स्वाधीन केले. इतकेच नव्हेतर इंग्रजांच्या मागणीप्रमाणे त्यांना ठाणे, वसई, साष्टी इ. प्रदेश कायमचा तोडून दिला. यापैकी वसई सोडून इतर प्रदेश इंग्रजांनी आधीच लबाडीने जिंकून घेतला होता. त्याला त्यांच्या मते पेशवा असलेल्या राघोबाकडून मान्यता मिळवून त्यांनी कायदेशीर स्वरुप दिले.

मुंबईकर इंग्रजांनी राघोबाची बाजू उचलली ती राघोबावर अन्याय झाला होता म्हणून नव्हे, तसे करण्यात त्यांना कांही लभ्यांश साधावयाचा होता. मुंबई येथे वखार स्थापन्यामागे ईस्ट इंडिया कंपनीचा हेतू व्यापार करण्याचा होता. हे बंदर सुरक्षित राखण्यासाठी त्यांनी मुंबई बेट संपादून त्याची तटबंदी केली. पण मुंबई बंदरात येणारा कंपनीचा व्यापारी माल खुष्कीच्या बाजूने देशावर रवाना होण्यास ठाणे-साष्टी हाच मुख्य मार्ग होता. त्यापुढे डोंगर व घाट लागतात व तेथून मराठयांचा मुलुख लागतो. म्हणून इंग्रजांनी साष्टी घेतली. पण साष्टीखेरीज मुंबईलगतची दुसरी बेटे आणि वसईदेखील त्यांना हवी होती. ती त्यांना देण्यास राघोबा खुषीने तयार झाला होता. पुढे वसईपासून सुरतेपर्यंतची ठाणीही त्यांना व्यापाराच्यादृष्टीने महत्त्वाची होती. तीही देण्यास राघोबा तयार होता. हा सर्व मुलुख इंग्रजांच्या हाती आल्यास ईस्ट इंडिया

कंपनीचा व्यापार बिनधोक चालणार होता. यापूर्वीच १४ लाखांचा लोकरीचा माल महाराष्ट्रात खपत होता. शिवाय गुजराथेतील कपाशीचा मुलुख हाती आल्यास, बंगाल व चीनकडील व्यापार वाढण्यासारखा होता. ही सर्व कोकणपट्टी हाती आल्यास डच, पोर्तुगीज व फ्रेंच या तिघांच्याही हातातून हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावरील व्यापार काढून घेऊन एकटया ईस्ट इंडिया कंपनीसच व्यापारी मक्तेदार बनता येण्यासारखे होते. मुंबई बंदर नवीन जहाजे बांधण्याच्या सोईचे होते आणि राघोबाकडून मिळणाऱ्या नवीन मुलुखातून त्यासाठी लागणारे लाकूड मुबलक मिळण्यासारखे होते. शिवाय राघोबाला मुठीत ठेवल्यानंतर इंग्रज मराठयाच्या राज्यकारभारात हवी तशी ढवळाढवळ करु शकले अस्ते. या सर्व फायदयांचा विचार करता पेशव्यांचे भांडण लावून देऊन 'देव आम्हास नवस न करता पावला' हे इंग्रजांचे उद्‌गार लक्षात ठेवण्यासारखे आहेत.

सुरतेचा तह झाल्यावर मुंबईकरांनी कर्नल कीटिंग यास राघोबाच्या मदतीस जाण्याचा हुकूम केला. राघोबा व कटिंग यांची सुरतेस फेब्रुवारीच्या अखेरीस गाठ पडली. लवकरच दाटा (खंबायतपासून १९ मैल) राघोबाचे व इंग्रजांचे सैन्य सुमारे ५० हजारांपर्यंत जमले. त्याचवेळी हरीपंत फडके याच्या हाताखालील पुणे दरबारची फौज, शिंदे व होळकर माळव्यात परत गेल्यामुळे कमी झाली आणि बरेच दिवस पगार न मिळाल्यामुळे बेदिलीही झाली. अशा परिस्थितीत आडास या गावाजवळ उभय सैन्यांची गाठ पडून लढाई झाली. तीत दोन्ही बाजूंचे नुसकान होऊन विजय कोणासच मिळाला नाही. मराठयांवर सहज विजय मिळवू असे म्हणणाऱ्या किटिंगला मराठयांच्या गनिमी काव्याचा अनुभव प्रथमच येऊन त्यांच्या लष्करी सामर्थ्याबद्दल त्याचा भ्रमनिरास झाला. यानंतर लवकरच पावसाळा सुरु झाला. त्यामुळे गनिमी काव्याने लढणाऱ्या

हरीपंताच्या फौजेच्या मागे न लागता कीटिंग यास डभई येथे पावसाळी छावणी करुन रहावे लागेले.[८९]

## पुरंदरचा तह (१/३/१७७६)

महाराष्ट्र गुजराथेत हया घडामोडी चालू असता, कलकत्त्याचा गव्हर्नर जनरल वॉटन हेस्टिंग्ज वेगळाच विचार करीत होता. इ.स. १७७३ च्या रेग्युलेटिंग ॲक्टप्रमाणे कलकत्त्याच्या गव्हर्नर जनरलला मुंबई व मद्रासच्या गव्हर्नरांवर अधिकार गाजविण्याचा हक्क मिळाला होता. हेस्टिंग्जने मराठयांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करुन दंडेलीचे राजकारण चालविल्याबद्दल मुंबई कौन्सिलचा निषेध केला. त्यांच्या या धोरणामुळे ईस्ट इंडिया कंपनीच्या हिंदुस्थानातील सत्तेला, व्यापाराला व प्रतिष्ठेला धक्का पोहचण्याचा संभव आहे असे त्याने मुंबईकरांना बजावले आणि आपल्या फौजा गुजराथेतून मागे घेण्याचा त्यांना आदेश दिला. हा आदेश धुडकावून लावून मुंबईकरांनी युध्द पुढे चालूच ठेवले. हेस्टिग्जंने आपण मुंबईकरांना समज दिल्याचे व तहाच्या वाटाघाटीसाठी स्वतःचा वकील पुण्याला पाठवित असल्याचे पुणे दरबारला कळविले.

हेस्टिंग्जचा वकील कर्नल अप्टन ऑक्टोबर १७७५ मध्ये कलकत्त्याहून पुण्याकडे निघाला. मुंबई कौन्सिल व राघोबा यांनी त्यांच्या मध्यस्थीस कडाडून विरोध केला. पण हेस्टिंग्जने याकडे दूर्लक्ष केले. इ.स. १७७६ च्या आरंभी पुण्यास पोहचल्यावर बाल पेशवा सवाई माधवराव हा नकली, खोटा नाही याची प्रथम ॲप्टनने खात्री करुन घेतली मग त्याने नाना बापूशी तहाच्या वाटाघाटी सुरु केल्या. ॲप्टनची चाल सरळ नव्हती. राघोबाला पेशव्याचा कारभारी नेमावे अशी तो राघोबाची वकीली करु लागला. खुनी माणूस कारभारी होऊ शकत नाही व राघोबाचा प्रश्न हा मराठयांचा अंतर्गत प्रश्न आहे, असे नाना बापूंनी ॲप्टनला ठणकावून सांगितले. राघोबाकडून

इंग्रजांना पन्नास लाख रुपये येणे असलेले पुणे दरबारने द्यावेत अशी अप्टनने मागणी करताच त्याच्याशी आपला संबंध काय? असे विचारुन कारभाऱ्यांनी त्याला निरुत्तर केले. आता बोलणी फिस्कटल्यासारखीच झाली. ही बोलणी चालू असता हरीपंत व कीटिंग यांच्या लष्करी हालचाली मंदावल्या होत्या. कारभाऱ्यांनी पुन्हा जोरात लढाई सुरु करण्याचे हुकूम हरीपंतांस सोडले. पण याचवेळी इ. स. १७६५ पासून रत्नागिरीच्या तुरुंगात असलेल्या सदाशिवरावचा तोतया तेथून निसटला व त्याने दंगा सुरु केला. या दंग्याने उग्र स्वरुप धारण केल्यामुळे नाना बापूंची तारांबळ उडून त्यांनी घाईघाईने १ मार्च १७७६ रोजी अप्टनशी तह उरकून घेतला. तोच पुरंदरचा तह होय.

पुरंदरच्या तहानुसार ठाणे व साष्टी इंग्रजांच्या ताब्यात राहू देण्यास पुणे दरबारने मान्यता दिली. राघोबापायी इंग्रजांना आलेल्या खर्चाबद्दल १२ लाख रुपये मुंबईकरांना देण्यासही पुणे दरबारने मान्यता दिली. राघोबाने कारभारातून बाजूला होऊन वर्षाला ३ लाख १५ हजार रुपयांची नेमणूक घेऊन स्वस्थ बसावे ही व्यवस्था अप्टनने मान्य केली. गुजराथेत मराठयांचा जो मुलुख इंग्रजांनी जिंकून घेतला होता तो मराठयांना परत करण्यास अप्टनने अनुमती दिली.

मराठयांच्या दृष्टिने पुरंदरचा तह समाधानकारक नव्हता. त्यांना आपला सहा लाख रुपयांचा प्रदेश गमवावा लागला. रणांगणावर याद राहील असा तडाखा ते इंग्रजांना देऊ शकले नाहीत. शिंदे-होळकर निमूटपणे सर्व खेळ पहात होते. एकटया हरीपंतावरच युध्दाचा सर्व भार पडला होता. फौजेचा वेळच्यावेळी पगार होतच नव्हता, युध्द साहित्य कमी पडत होते.

मुंबईकर इंग्रजासही पुरंदरच्या तहाने समाधान झाले नव्हते. सहा लक्षाच्या मुलुखांपेक्षाही राघोबा आपल्या ताब्यात रहाण्यात अधिक फायदा आहे असे त्यांना

वाटत असावे. त्यांनी राघोबास पुणे दरबारच्या स्वाधीन न करता त्यास दरमहा १० हजार पेन्शन देऊन मुंबईस ठेऊन घेतले. तसेच आपली फौजही युध्दाच्या तयारीने गुजराथेत ठेवली. शिवाय त्यांनी कलकत्तेवर इंग्रजाविरुध्द इंग्लंडास खुद्द राजाकडे दाद मागण्याचा सनदशीर चळवळीचा मार्ग राघोबास सुचविला. राघोबाने त्यानुसार इंग्लंडच्या राजास एक पत्र लिहून कलकत्तेकरांनी आपल्यावर चालविलेल्या अन्यायाविरुध्द दाद मागितली पण या पत्राचा म्हणावा तसा उपयोग झाला नाही.

पुरंदरचा तह मोडून मुंबईकरांनी राघोबास पुन्हा आश्रय दिल्याचे पाहून पुणे दरबारने राघोबासंबंधीची मुख्य अट प्रत्यक्षात येईपर्यंत आपण पुरंदर तहाच्या इतर अटी अंमलात आणणार नाही असे कलकत्तेकर इंग्रजांना कळविले. तेंव्हा धड युध्द नाही व धड तहही नाही अशी विचित्र परिस्थिती निर्माण झाली. पुरंदराच्या तहाची कलमे अंमलात यावीत म्हणून नाना फडणीस झटत होता. तर दुसरीकडे राघोबाही मुंबईकरांनी सुरतेच्या तहाची कलमे अंमलात आणावीत याबद्दल तितक्याच जोराने धडपडत होता.[१०]

**वडगांवचा तह**

याचवेळी पुण्यात एक नवीनच प्रकरण उद्‌भवले होते. पुण्यातील राघोबाशी अंतस्थ सूत असणाऱ्या लोकांनी उचल करुन राघोबास पुण्यास आणण्याविषयी इंग्रजांकडे बोलणे लावले. त्याचा फायदा मुंबईकरांनी सहाजिकच घेतला. याच कारस्थानात सखाराम बापू, मोरोबा फडणीस, बजाबा पुरंदरे आणि तुकोजी होळकर ही माणसे सामील झाली होती. पुरंदरचा तह झालेला असताही मुंबईकरांनी रचलेले कारस्थान सेंट ल्युबीनच्या तहाची सबब सांगून हेस्टिंग्जने उचलून धरले. मराठयांच्या अंतर्गत भांडणात पडण्याची जी गोष्ट पूर्वी त्याला अयोग्य व अन्याय्य वाटत होती तीच आता त्याला कंपनीच्या हिताच्यादृष्टीने योग्य वाटू लागली. पुरंदरच्या

तहावर सही करणाऱ्या एका प्रमुख कारभाऱ्याने म्हणजे सखाराम बापूने ज्या अर्थी त्या तहाच्या अटी मोडण्याची सूचना आपण होऊन केली त्या अर्थी राघोबाला पुण्यास जाणे जरुर आहे असे मत त्याने मुंबईच्या गव्हर्नरास लिहिलेल्या पत्रात दिले. इतकेच नव्हेतर कर्नल लेस्ली याच्या हाताखाली सैन्य देऊन त्यास मुंबईकडे रवाना केले.

दरम्यान नानाने फितूर मोरोबा फडणीस यास त्यावेळी पुण्यास आलेल्या महादजी शिंदेच्या मदतीने कैद करुन किल्ल्यावर ठेवले. तथापि मुंबईकरांनी काढलेल्या गुप्त बातमीवरुन मराठेशाहीत कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नाही असे त्यांना दिसून आले. म्हणून त्यांनी राघोबास पुण्यास नेण्याचा बेत कायम केला. कलकत्त्याहून येणाऱ्या कर्नल लेस्लीच्या फौजेची त्यांनी वाटही पाहिली नाही. घाईघाईने २४/११/१७७८ रोजी राघोबाशी नवीन तह करुन लगेच दुसऱ्या दिवशी कर्नल इगर्टन याच्या हाताखाली ५०० गोरे व २ हजार हिंदी शिपाई देऊन मुंबई बंदरातून त्याची रवानगी केली. राजकारणी बोलणी करण्याकरिता जॉन कारनॅल व थॉमस या दोघा मुलकी अधिकाऱ्यांना इगर्टनच्या मदतीस देण्यात येऊन तिघांची 'पुणे कमिटी' नेमण्यात आली.

वॉरन हेस्टिंग्जने पाठविलेला कर्नल लेस्ली कलकत्त्याहून फौजा घेऊन निघाला, पण त्यास प्रथमपासूनच फार अडचणी येत गेल्या. प्रवासात त्याचे व त्याच्या सैन्याचे खूप हाल झाले. ऑक्टोबर १७७८ ला लेस्ली आजारी पडून मरण पावला.त्याच्या जागी गॉडर्ड याची सेनापती म्हणून नेमणूक झाली. गॉडर्ड त्वरेने पुण्यास निघाला. कर्नल लेस्ली व गॉडर्ड या दोघानाही बुंदेलखंडातील पेशव्यांचा मुलकी अधिकारी बाळाजी गोविंद खेर याने प्रखर विरोध केला. त्यामुळे गॉडर्ड वेळेत मुंबईकरांच्या मदतीस जाऊ शकला नाही.

मुंबईहून राघोबा स्वतःचे व इंग्रजांचे मिळून दहा हजार सैन्य घेऊन निघाला. नोव्हेंबर १७७८ मध्ये निघालेले हे सैन्य वाटेतील मराठयांचा विरोध मोडून काढून डिसेंबरच्या मध्यास खंडाळयाच्या माथ्यावर पोहचले. खंडाळयाच्या माथ्यावर असेपर्यंत इंग्रज सैन्याची स्थिती मराठयांच्या सैन्यापेक्षा मजबूत होती. कारण खंडाळयाच्या उंच माथ्यावरुन ते मराठयांच्या सैन्यावर ते तोफांचा अचूक मारा करु शकत होतें. कर्नल गॉडर्ड येईपर्यंत सेनापती इगर्टनने वाट पाहिली असती तर मुंबईकरांच्या सैन्याची बाजू अधिक भक्कम झाली असती पण आपण घाट उतरताच शिंदे-होळकर आपणास येऊन मिळतील या चुकीच्या बातमीवर विसंबून इगर्टनचे सैन्य खंडाळयाचा घाट उतरुन पुण्याकडे जाऊ लागले. पण ही इंग्रजी सेनापतीची घोडचूक होती आणि तिचा पुरेपुर फायदा गनिमी काव्याने लढणाऱ्या मराठी सेनानींनी घेतला.

इगर्टनचे सैन्य वाटेतील प्रदेश पादाक्रांत करीत जानेवारी १७७९ पर्यंत तळेगांवास येऊन पोहाचले पण इंग्रजांचे हे धाडस त्यांना महागात पडले. त्या ठिकाणी पोहचेपर्यंत कित्येक इंग्रज अधिकारी ठार झाले होते. या मोहिमेचा सूत्रधार थॉमस मॉस्टिन आजारी पडला व वाटेतूनच मुंबईला परत जाऊन नव्या वर्षदिनी निधन पावला. कार्ला येथील चकमकीत कॅप्टन स्टुअर्ट (इस्टुर फाकडा) हा पराक्रमी सेनानी मारला गेला. पेशव्यांचा गोलंदाज भिवराव पानसे याने खंडाळयापासून तळेगांव पर्यंत इंग्रजांस हैराण केले. शिंदे व होळकर इंग्रजांचा अपेक्षा भंग करुन त्यांच्यावर तुटून पडले. इंग्रज तळेगांवास पोहचले तेंव्हा तो गांव व त्याच्या आसपासचा प्रदेश मराठयांनी जाळून लुटून फस्त केला होता. इंग्रजी सैन्याला धान्याचा दाणाही मिळणार नाही अशी व्यवस्था त्यांनी केली होती. जानेवारी १७७९ च्या मध्यापर्यंत सुमारे ५० हजार फौज घेऊन स्वतः नाना, बापू व महादजी शिंदे वडगांव जवळील एका टेकडीवर मुक्काम

ठोकून होते. इंग्रजांस आपल्यावरील संकट कळून चुकले. पुण्याच्या रोखाने पुढे जाण्याची तर सोयच नव्हती. इंग्रजांचे सैन्य मग तळेगावाहून वडगांवच्या बाजूला मागेमागे जाऊ लागले. पण मराठयांनी आपणास चारी बाजूंनी वेढले असल्याचे त्यांच्या लक्षात आले. मग शरणागती पत्करण्यावाचून त्यांना गत्यंतर नव्हते.

इंग्रजांच्या लष्कारातून निरनिराळे लोक तहाच्या वाटाघाटीसाठी मराठयांच्या छावणीत येऊ लागले. सखाराम बापू, मराठे व इंग्रज या दोघात मध्यस्थ बनू पहात होता. राघोबाने तुकोजी होळकरांमार्फत बोलणी सुरु केली होती. महादजी शिंदेने या सर्वांस धुडकावून लावले आणि तहाची बोलणी करण्यासाठी आलेला इंग्रज अधिकारी फार्मर याला सही शिक्का केलेला कोरा कागद हाती देणे भाग पाडले. अखेरीस तहाची कलमे पुढीलप्रमाणे ठरली.

१. इंग्रजांनी राघोबास ताबडतोब मराठयांच्या स्वाधीन करावे.

२. साष्टी, ठाणे व गुजराथमधील सर्व मुलुख इंग्रजांनी मराठयांना परत करावा.

३. बंगालमधून निघालेल्या गॉडर्डच्या फौजास परत माघारी बोलावून घेण्यात यावे.

४. हा तह पाळला जावा म्हणून ले स्टुअर्ट व फार्मर या दोघांना मराठयांकडे ओलीस ठेवण्यात यावे.

वडगांवचा अपमानास्पद तह मुंबई सरकारला मुळीच पसंत पडला नाही. ज्या लोकांना तह करण्याचा कोणताही अधिकार मुंबई कौन्सिलने दिला नव्हता त्यांनी अडचणीच्या परिस्थितीत केलेला तह बेकायदेशीर आहे अशी सबब सांगून मुंबईकरांनी

वडगांवचा तह धुडकावून लावला. महादजीने इंग्रजांची फौज वडगांवहून मुंबईला सुरक्षितपणे जाऊ दिली. त्यामुळेच इंग्रज हे धाडस करु शकले. वॉरन हेस्टींग्जने मुंबई सरकारच्या भूमिकेला पाठींबा दिला आणि कर्नल गॉडर्डला पुण्यावर चालून जाण्याचा हुकूम दिला. त्याप्रमाणे कर्नल गॉडर्ड बुंदेलखंडातून येऊन पोहचला. त्यानंतर एप्रिल १७७९ मध्ये राघोबा झाशीच्या मार्गावर असता महादजीचा अधिकारी हरी बाबाजी याच्या नजरकैदेतून निसटला व सुरतेस गॉडर्डच्या आश्रयास गेला. गॉडर्डने वडगांवच्या तहाविरुध्द त्याला आश्रय दिल्याने सर्व राजकारणाला वेगळीच कलाटणी मिळाली.[११]

## इंग्रजांविरुध्द चौकडीचा संघ

पेशव्यांच्या बाजूने कोकणात लढाई बऱ्यापैकी चालली होती. इ.स. १७८० च्या ऑगस्टमध्ये कॅप्टन ॲबिग्टन याने कल्याणपासून १० मैलावर असलेल्या मलंगगडास वेढा घातला. पण किल्ल्याचा अधिकारी पांडुरंग संभाजी केतकर याने इंग्रजांचे तीन हल्ले मारुन काढून किल्ला नोव्हेंबरपर्यंत लढविला. अखेर इंग्रजांना वेढा उठवून निघून जावे लागले. पण डिसेंबरात गॉडर्डने मराठयांचा वसई किल्ला जिंकून त्यांना एक धक्का दिला. नंतर याच दमाने पुण्यावर चालून जाण्यासाठी तो १७८१ च्या फेब्रुवारी महिन्यात बोरघाटात जाऊन पोहचला. पण त्यानंतर घाट उतरुन पुण्याकडे जाणे त्यास धोक्याचे आहे असे आढळून आले. तशातच मुंबईकरांनी त्याला कल्याणास परत येऊन पावसाळयात सैन्याची छावणी खुद्द मुंबईस करण्याचा आग्रह केला म्हणून त्याने सैन्याचे तोंड फिरवून कल्याणचा रस्ता पकडला. पण वाटेत मराठयांच्या फौजेने आणि त्यांच्याबरोबर असलेल्या पेंढाऱ्यांनी गनिमी छापे घालून गॉर्डर्डचे खूप नुसकान केले. या कामगिरीत परशुरामभाऊ पटवर्धन व हरीपंत फडके यांनी विशेष मर्दुमकी गाजविली. गॉडर्ड पनवेलला परतत असताना, १६,२६ व २९ मार्च रोजी व फिरुन

२० व २३ एप्रिल १७८१ रोजी उभयपक्षी मोठया चकमकी झाल्या. त्यात इंग्रज फौजेची खूप नासाडी झाली. तरीही गॉडर्डने पनवेल गाठलेच.

गॉडर्डने माघार घेतल्यावर कोकण आघाडीवरील इंग्रज-मराठा संघर्ष संपुष्टात आला ही आजपर्यंत असलेली समजूत चुकीची आहे. गॉडर्डच्या माघारीनंतर थोडयाच दिवसात नाना फडणीसाने बाळाजी विश्वनाथ फाटक यांच्या हाताखाली सैन्य देऊन इंग्रजांच्या ठाणे, साष्टी वगैरे प्रदेशाच्याजवळच्या भागात एक छोटीशी आक्रमक स्वरुपाची चढाई केली. ही चढाई मे १७८१ ते १७८२ च्या मध्यापर्यंत चालू होती. या काळात बाळाजी विश्वनाथने इंग्रजांचा मराठयांच्या कोहज किल्ल्याला बसलेला वेढा उठविला. यानंतर त्याने सूर्या व वैतरणी नदी या नद्यांच्या काठावर झालेल्या चकमकीमध्ये इंग्रज सैन्यांच्या छोटया तुकडयांचा पराभव केला व पुढे माहिम येथील बाजारपेठेत शिरुन ती त्याने जाळली. याचवेळी मराठयांनी टकमक, तांदुळवाडी, काळदुर्ग हे किल्ले जिंकून घेतले. मराठयांना या कामी जव्हारच्या कोळी राजाची खूप मदत झाली.[१२]

कोकणचा कल्याण प्रांत सन १७८१ मध्ये इंग्रजांच्या ताब्यात गेला. कल्याण हाती आल्यावर वसईसह सर्व प्रदेश आपल्या ताब्यात यावा असे इंग्रजांना वाटत होते. उत्तर कोकणात १८ व्या शतकाच्या अखेरीस इंग्रज आणि पेशवे असा संघर्ष होणे नैसर्गिक होते. कारण उत्तर कोकणात पोर्तुगीजांची सत्ता कमी झाल्यानंतर पेशव्यांचीच सत्ता ही प्रमुख सत्ता होती. इंग्रजांची या परिसरात आपली सत्ता वाढविण्याची तीव्र इच्छा होती. त्यामुळे पेशवे आणि इंग्रज असा अंतीम संघर्ष होणे अटळ होते.

सन १७८२ मध्ये पहिल्या मराठा इंग्रज युध्दाचा शेवट झाला. त्यावेळी १७ मे १७८२ रोजी ग्वाल्हेरपासून २० मैलावर असलेल्या सालबाई येथे इंग्रजांनी मराठयांशी

तह केला. त्या तहाला सालबाईचा तह असे म्हणतात. या तहानुसार मराठयांनी कोकणातील साष्टी व ठाण इंग्रजांकडे रहाण्यास मान्यता दिली पण वसई व आपसपासचा प्रदेश मात्र मराठयांना परत मिळावा अशी अट घालण्यात आली. यानुसार साष्टी आणि ठाणे यावर इंग्रजांचा कायदेशीर ताबा निर्माण झाला. सन १७८२ पासून पुढे १७९६ पर्यंत इंग्रजांनी उत्तर कोकणात आपला प्रभाव वाढविण्यासाठी फारसे प्रयत्न केले नाहीत. पण सन १८०२ पासून १८१८ पर्यंत या १६ वर्षाच्या काळात उत्तर कोकणातील पेशव्यांची सत्ता नष्ट करुन इंगजांची सत्ता स्थापण्याचे जोरदार प्रयत्न केले. २५ ऑक्टोबर १७९५ रोजी सवाई माधवरावाने गच्छीवरुन खाली उडी घेतल्यामुळे २७ ऑक्टोबर रोजी त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर राघोबाचा मुलगा बाजीराव दुसरा हा पेशवा बनण्यास अत्यंत उत्सुक होता. पण पूर्वी राघोबाला नाना फडणीसाने विरोध केल्यामुळे बाजीरावाला पेशवा बनविण्यास नाना फडणीसाचा विरोध होता. बाजीराव दुसरा व नाना फडणीसाची ११ मार्च १७९६ रोजी दिलजमाई होऊन दोघांमध्ये करार झाला. पण दौलतराव शिंदेचे सरदार बाजीरावास फितूर आहेत असा नानाला दाट संशय होता. त्यामुळे त्यांचे आपसात भांडण लावून परस्पर काटा काढण्याचे कारस्थान नाना फडणीस करीत होता. १० जून १७९६ पासून १० नोव्हेंबर १७९६ पर्यंत नाना फडणीसाचा मुक्काम कोकणात महाडास होता. नानाने महाडहून आपल्या सहाय्यासाठी चहुबाजूने माणसे जमविण्याचा उद्योग सुरु केला. दौलतराव शिंदेचा नानाला आणि बाजीराव पेशव्याला विरोध होता. त्यामुळे दौलतराव शिंदेने त्यांच्या मार्गात आडकाठी निर्माण करण्याचा प्रयत्न केला. नानाने इंग्रजांशी मदतीची बोलणी केली व असे वचन दिले की, इंगजांनी बाजीरावास पुण्यास पेशवाईवर बसवावे त्याकरिता त्यास २५ लाख उत्पन्नाचा मुलूख तोडून दिला जाईल व तेवढीच रक्कम दिली जाईल व बाजीरावाचे सरकार इंगजांशी दोस्ती राखून राहिल.[९३]

या सर्वांचा परिणाम म्हणून पेशवेपदावर असणाऱ्या चिमाजी आप्पाचा जुन्नरच्या लढाईत पराभव झाला व नानाच्या मदतीने ५/१२/१७९६ रोजी बाजीरावास पेशवेपद प्राप्त झाले. या सर्व प्रकरणाला महाडचे कारस्थान म्हटले जाते. इंग्रजांच्या वर्चस्वाची आपत्ती टाळावी व मराठी राज्याचे स्वातंत्र्य कायम राखावे म्हणून महाडचे कारस्थान रचिले असे खरेशास्त्री म्हणतात.[९४]

बाजीराव दुसरा पेशवे पदावर आल्यानंतर मराठी राज्यात कांहीसे अराजक निर्माण झाले. यशवंतराव होळकर व बाजीराव यांचे वितुष्ट आल्यामुळे सन १८०२ मध्ये यशवंतराव होळकराच्या धामधुमीत बाजीरावास पुण्याहून पळ काढावा लागला. यशवंतराव होळकराने रायगड व सुवर्णदुर्ग हे किल्ले हस्तगत केले. सुवर्णदुर्ग येथे असलेला पेशव्यांचा कुटुंबकबिलाही त्याच्या ताब्यात आला. बाजीराव पळून वसईला गेला व तेथे इंग्रज व बाजीराव यांच्यामध्ये ३१/१२/१८०२ रोजी वसईचा कुप्रसिध्द तह झाला. २७ एप्रिल १८०३ पर्यंत मराठी राज्याच्या आणि कोकणाच्या स्वातंत्र्याला शेवटची घरघर लागली. या तहानुसार इंग्रजांनी पेशवाईच्या सरंक्षणाची जबाबदारी घेतली व त्यासाठी ६ पलटणी, तोफा वगैरे युध्द साहित्य बाजीरावाच्या मुलुखात कायम ठेवण्याची परवानगी मिळविली. या पलटणींच्या खर्चासाठी बाजीरावाने २६ लाख उत्पन्नाचा मुलुख इंग्रजांना तोडून देण्याचे मान्य केले. इंग्रजांच्या मदतीने बाजीरावाचे पुण्यात आगमन होऊन १३ मे रोजी पुन्हा तो पेशवेपदावर आरुढ झाला.[९५]

वसईच्या तहापासून इंग्रजांचे बाजीरावावर वर्चस्व निर्माण झाले. पेशव्यांची सर्वाभौम सत्ता नष्ट होऊन तो इंग्रजंचा मांडलिक बनला.

सन १८०३ ते १८०५ या कालखंडात इंग्रजांनी उत्तर हिंदुस्थानात दौलतराव शिंदे, रघुजी भोसले व यशवंतराव होळकर यांना नामोहरम करुन त्यांच्याशी स्वतंत्र

तह करुन त्यांना बाजीराव पेशव्यापासून वेगळे पाडले आणि त्यानंतर इंगजांनी कोकण व पेशव्यांच्या इतर प्रदेशाकडे आपले लक्ष केंद्रीत केले. सन १८०३ ते १८१५ पर्यंतच्या काळात दक्षिण कोकणात सावंतवाडीकर व कोल्हापूरकर यांच्यावर आपला वचक निर्माण केला व त्यानंतर उत्तर कोकण आपल्या ताब्यात आणण्यासाठी प्रयत्नाला सुरुवात केली. गंगाधरशास्त्री हा बडोदा राज्याचा प्रतिनिधी इंग्रजांचा खास मित्र होता. पण पंढरपूर येथे त्याचा खून करण्यात आला व त्या प्रकरणी बाजीरावाच्या मर्जीतील त्रिंबकजी डेंगळे जबाबदार होता अशी इंग्रजांची समजूत होती. इंग्रजांनी त्याला पकडून ठाणेच्या किल्ल्यात कैदेत ठेवले. पण तेथून त्रिंबकजीने मोठया युक्तीने आपली सुटका करुन घेतली. १३ जून १८१७ रोजी माऊंट स्टुअर्ट एल्फीस्टनने बाजीरावाबरोबर तह केला यात बेलापूर, अटगाव, कल्याण हा प्रदेश व तेथून गुजरातपर्यंतची सर्व कोकणपट्टी म्हणजे जवळजवळ सर्व उत्तर कोकणचा भाग इंग्रजांच्याकडे आला. बाजीरावाने नाईलाजाने हा तह केला होता. त्याच्या चिथावणीने भिल्ल व रामोशांच्या तुकडयांनी उत्तर कोकणाच्या घाटाच्या खिंडीत नाकेबंदी करावयास सुरुवात केली. कल्याण प्रांतातही त्यांनी हल्ले केले. नोव्हेंबरात त्यांनी बोरघाटाचा ताबा घेतला. शेवटच्या झटापटीत डिसेंबर १८१७ मध्ये पेशवा उत्तरेकडे जावू लागला तेव्हा उत्तर कोकणात त्याने प्रवेश करु नये म्हणून सर्व बंदोबस्त ठेवण्यात आला. बापूराव कंबे नावाच्या एका सरदाराने उत्तर कोकणातील उथळीगड हा किल्ला बाजीरावाच्यावतीने काबीज केला. पण कॅप्टन ब्रुक्सने पुन्हा तो जिंकून घेतला. इंग्रजांनी सुवर्णदुर्ग, अंजनवेल, रसाळगड, मदनगड हे किल्ले डिसेंबरच्या प्रांरभी घेतले. कर्नल प्रॉथर याने जानेवारी १८१८ मध्ये ठाणे घेतले व फेब्रुवारी महिन्यात अवचितगड, सोनगड व पाली ही ठाणी घेतली. कॅप्टन प्रॉथर याने राजमाची, कुवारीगड इ. किल्ले घेऊन पुणे, मुंबई मार्गावर इंग्रजांचे प्रभुत्व निर्माण केले. बापूराव कंबे कोळयांच्या मदतीने कोकणात

लुटालुट करीत होता. कॅप्टन बॅरो यांने कसुर घाटाजवळ त्याचा पराभव केला. कॅप्टन केनेडी याने खेड जिल्हयातील रामगड व पालगड हे किल्ले घेतले. रसाळगड किल्ला घेण्यासाठी किल्लेदाराला ५००० रुपये द्यावे लागले. अशा रितीने खेड भागावर त्याने कबजा मिळविला. एप्रिल १८१८ मध्ये कर्नल प्रॉथरची फौज पुन्हा कोकणात आली. तळे व घोसाळे हे किल्ले घेऊन २४ एप्रिल रोजी तो महाडला आला. त्यानंतर २६ एप्रिल रोजी सर्व इंग्रज सैन्याने रायगडला वेढा दिला. पुढे १० मे पर्यंत वाटाघाटी होऊन रायगड खाली करुन देण्यात आला. त्यानंतर लिंगाणा, कांगोरी, चंदनगड व महिपतगड हे किल्ले इंग्रज फौजांनी जिंकून घेतले. दरम्यानच्या काळात कॅप्टन इमलॅकच्या हाताखालील मालवण येथील एका पलटणीने साष्टीतील पेशव्यांची सर्व ठाणी जिंकून घेतली. त्यानंतर सिध्दगड, अचरे, भगवंतगड इंग्रजांच्या ताब्यात आले. देवगड घेतल्यावर विजयदुर्गाकडे मोर्चे लावण्यात आले. पण किल्ल्यावरुन प्रतिकार झाला. कॅप्टन केनेडीने सुवर्णदुर्गाच्या भागातील सर्व किल्ले घेतल्यावर बैरामगड, भगवंतगड हे किल्ले घेतले. जूनच्या प्रारंभापर्यंत रत्नागिरी, पुरणगड, जयगड, सातवली हे किल्ले इंग्रजांच्या ताब्यात आले. धुळपांच्या ताब्यातील विजयदुर्ग इंग्रजांच्या ताब्यात आला.[९६]

अशा रितीने जून १८१८ पर्यंत कोकणचा सर्व भाग ब्रिटीश अंमलाखाली आला. मात्र कांही टोळया कोकणात कांही काळ लुटमार करीत होत्या. सप्टेंबर १८१८ मध्ये ले. क्रॉसबो याने अरग, पठाण व मराठयांच्या ५०० लोकांच्या एका टोळीवर पोलादपूर येथे हल्ला करुन त्यांचा समूळ उच्छेद करुन टाकला. अशा प्रकारे सन १८१८ च्या अखेरीपर्यंत कोकणातील मराठी राज्याचा शेवट झाला व त्या ठिकाणी इंग्रजांचा अंमल चालू झाला.

## संदर्भ साधने


१. डॉ. वि. गो. खोबरेकर - कोकणचा राजकीय इतिहास, इ. स. पू. ते इ. स. १८००, पृ. २१३, २१७

२. कित्ता, पृ. २१५, २२७, २२८, २३१

३. डॉ. जयसिंगराव पवार, शिवाजी व शिवकाल, पृ. २०४ Text Book

४. खोबरेकर, पूर्वोक्त, पृ. २१०

५. खोबरेकर, पूर्वोक्त, पृ. २३३

६. पी. एस्. पिसुर्लेकर, पोर्तुगीज, मराठे संबंध, पृ. २८५, ८६, ८७

७. खोबरेकर, पूर्वोक्त, पृ. २१६

८. कित्ता, पृ. २१८

९. कित्ता, पृ. २३४

१०. गॅझेटिअर ऑफ बॉंबे प्रेसिडेन्सी, रत्नागिरी अँड सावंतवाडी १०, (बॉंबे प्रिंटिंग प्रेस, १८८०) ३४७

११. एस्. एस्. देसाई संपादित मराठयांच्या इतिहासाची साधने, पोर्तुगीज दप्तर २, पृ. ७,८

१२. पिसुर्लेकर, पूर्वोक्त, पृ. १३३

१३. सबनीस, पंत आमत्य बावडा दप्तर, भाग १, पृ. १३८

१४. व्ही. पी. पिंगुळकर, सावंतवाडी संस्थानाचा इतिहास, पृ. ७४

१५. व्ही. व्ही. खरे, इचलकरंजी संस्थनाचा इतिहास, पृ. ४९

१६. कित्ता, पृ. ४९

१७. कित्ता,

१८. पिसुर्लेकर, पूर्वोक्त, पृ. २५८

१९. कित्ता,

२०. जी. एच्. खरे, शिवचरित्र साहित्य १३, पृ. ३९,४२

२१. पिसुर्लेकर, पूर्वोक्त, पृ. २६१

२२. पिंगुळकर, पूर्वोक्त, पृ. ७७

२३. पिसुर्लेकर, पूर्वोक, पृ. २६७

२४. कित्ता, पृ. २६८

२५. कित्ता,

२६. ग. ह. खरे, शिवचरित्र साहित्य, भाग १३, पृ. ४५

२७. कित्ता, पृ. ४८, ४९

२८. कित्ता, पृ. ५३

२९. कित्ता, पृ. ५४

३०. कित्ता, पृ. ५६

३१. ए.टी. सारंग, एक्सटर्नल रिलेशन्स ऑफ सावंतवाडी स्टेट, पीएच्. डी. प्रबंध, पृ. १५४

३२. कित्ता, पृ. १५४

३३. कित्ता, पृ. १५५

३४. सारंग ए.टी., पूर्वोक्त, पृ. १६२

३५. कित्ता, पृ. १५५

३६. गुजर - संपाद. करवीर छत्रपती घराण्याची साधने, भाग ६, पृ. ८४,८५

३७. पिसुर्लेकर, पूर्वोक्त, पृ. २८७

३८. कित्ता, पृ. २८८

३९. कित्ता, पृ. २८९

४०. ग.ह. खरे, पूर्वोक्त, पृ. ९५ ते १०३

४१. पिसुर्लेकर, पूर्वोक्त, पृ. २९३

४२. सारंग ए.टी., पूर्वोक्त, पृ. १७३

४३. गुजर एम.व्ही., पूर्वोक्त, भाग ८, पृ. ११२, ११३

४४. कित्ता,

४५. सारंग ए. टी., पूर्वोक्त, पृ. १७४

४६. देसाई एस्. एस्. संपादित मराठयांच्या इतिहासाची साधने, भाग २, पृ. ६०,६१

४७. कित्ता, पृ. ७०

४८. कित्ता, पृ. ७१

४९. कित्ता, पृ. ७२

५०. कित्ता, पृ. ७२,७३

५१. गुजर, पूर्वोक्त, पृ. ८, ११५

५२. पिसुर्लेकर, पूर्वोक्त, पृ. ३४

५३. पिंगुळकर, पूर्वोक्त, पृ. ३३

५४. कित्ता, पृ. ७९, ८०

५५. कित्ता, पृ. ८३

५६. देसाई एस्.एस्.,पूर्वोक्त, पृ. ३४

५७. मोडक बी.पी., कोल्हापूर प्रांताचा अर्वाचीन इतिहास, पृ. ३२

५८. गुजर, पूर्वोक्त, पृ. १३१

५९. ग.ह.खरे, पूर्वोक्त, भाग १३, पृ. ९७

६०. पिसुर्लेकर, पूर्वोक्त, पृ. २९७

६१. देसाई एस्. एस्., पूर्वोक्त, भाग २, पृ. ५२, ५३

६२. पिंगुळकर, पूर्वोक्त, पृ. ३९

६३. सारंग ए.टी., पूर्वोक्त, पृ. १७२

६४. कित्ता,

६५. देसाई एस्. एस्., पूर्वोक्त, भाग २, पृ. ६४

६६. कित्ता,

६७. कित्ता,

६८. पिंगुळकर, पूर्वोक्त, पृ. ८५

६९. गर्गे एस्. एम्., करवीर रियासत, पृ. ३०७

७०. पिंगुळकर, पूर्वोक्त, पृ. ७८

७१. कित्ता,

७२. कित्ता, पृ. ७९

७३. गुजर, पूर्वोक्त, पृ. ११, १२

७४. कित्ता,

७५. पिंगुळकर, पूर्वोक्त, पृ. १७६

७६. पोलिटिकल डिपार्टमेंट डायरी नं. ४५५; पृ. ५५५८-६०

७७. पिंगुळकर, पूर्वोक्त, पृ. १०५

७८. कित्ता, पृ. १९६

७९. कित्ता,

८०. कित्ता, पृ. १०७

८१. कोल्हापूर अर्काइव्हज्, चिटणीस दप्तर, रुमाल ४२, पुडके १, डॉक्युमेंट नं. ७३३९, सी. अपेंडिक्स, ए नं. ५२

८२. कित्ता,

८३. सारंग, पूर्वोक्त, पृ. २२२

८४. कित्ता, पृ. २३०

८५. कित्ता, पृ. २३१

८६. मराठयांचा इतिहास, संपादक अ. र. कुलकर्णी, ग. ह. खरे, लेखक मा. रा. कंटक

८७. कित्ता, पृ. १३१ ते १३४

८८. कित्ता, पृ. १३४,१३५

८९. कित्ता, पृ. १३४, १३५

९०. कित्ता, पृ. १३७ ते १३९

९१. कित्ता, पृ. १४०, १४१

९२. कित्ता, पृ. १४४, १४५

९३. डॉ. वि. गो. खोबरेकर, पूर्वोक्त, पृ. २२५

९४. सरदेसाई, मराठे रिसासत, उत्तर विभाग, खंड ३, पृ. ४६

९५. डॉ. वि. गो. खोबरेकर, पूर्वोक्त, पृ. २२९

९६. कित्ता, पृ. २३२, २३३